14 वर्ष वर्धापन दिन

पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३४८ ■ शनिवार, दि. २७ जून २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# गद्दार गेले सासरी, तिकडे गाढवाचं जिणं जगा !

# उद्धव ठाकरेंचा यवतमाळमध्ये जळजळीत प्रहार

## तर 'तो' खासदार 50 कोटीला विकला गेला, संजय राऊतांचा खळबळजनक आरोप !



राहुल वासनिक २७ जून

**यवतमाळः** 'आम्ही ज्याला रक्ताचं पाणी करून खासदार बनवलं, ज्याला मतदारांनी मशालीवर विश्वास ठेवून निवडून दिलं, त्या गद्दाराने जनतेच्या पाठीत खंजीर खुपसला. मुलीच्या लग्नाची सोयरीक जुळवायची आहे असं खोटं सांगून हा गद्दार खासदार थेट गद्दारांच्या लांडग्यांच्या कळपात जाऊन सामील झाला! इकडे वाघासारखं जगत होता, आता तिकडे जाऊन गाढवासारखं ओझं वाहत गाढवाचं जिणं जगा!' अशा अत्यंत तिखट आणि आक्रमक शब्दांत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी नुकतेच पक्षांतर केलेल्या यवतमाळ-वाशिमच्या बंडखोर खासदाराचा (संजय देशमुख) समाचार घेतला.

यवतमाळ येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आयोजित 'निष्ठेची वज्रमूठ' कार्यकर्ता मेळाव्यात उद्धव ठाकरे आणि खासदार संजय राऊत यांची तोफ भाजप आणि मिंदे गटावर धडकली. खासदार संजय राऊत यांनी नेहमीच्या आक्रमक शैलीत बंडखोरांचे वाभाडे काढले. राऊत म्हणाले, 'ही कृषी उत्पन्न बाजार समिती आहे, इथे शेतकऱ्यांचा माल विकला जातो. पण १५ दिवसांपूर्वी इथे एक ५० कोटींचा माल आला आणि थेट विकला गेला! ज्याला बाजारात ५०० रुपये कोणी दिले नसते, त्याला उद्धव ठाकरेंनी खांद्यावर भगवी शाल टाकून खासदार केलं म्हणून त्याची किंमत ५० कोटी झाली. पण लक्षात ठेवा, उद्याच्या निवडणुकीत त्याची किंमत ५ रुपयेही उरणार नाही!' राऊत यांनी पुढे अत्यंत तीव्र शब्दांत सुनावले की, 'एकनिष्ठ राहण्यासाठी आई नेक आणि बाप एक असावा लागतो! आम्ही बाळासाहेबांचे कट्टर शिवसैनिक आहोत. खासदाराच्या गद्दारीचा दुखवटा पाळत बसू नका; त्याचं दहावं-बारावं घाला आणि पुढच्या कामाला लागा. या गद्दारांना छाताडावर पाय देऊन गाडल्याशिवाय शिवसैनिक शांत बसणार नाही.या जाहीर सभेसाठी ठाकरे गटाचे युवा नेते आदित्य ठाकरे, खासदार संजय राऊत, अरविंद सावंत, विनायक राऊत आणि अनिल देसाई यांच्यासह पक्षाचे अनेक वरिष्ठ नेते यवतमाळात दाखल झाले आहेत. जिल्ह्यातील विविध तालुक्यांतून शिवसैनिक मोठ्या संख्येने सभेसाठी आले असून कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात मोठी गर्दी केली आहे.

### 'भाजप म्हणजे 'पाकिस्तान जनता पक्ष' होतोय की काय ?

उद्धव ठाकरेउद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणात जनतेची जाहीर माफी मागितली. 'माझ्या सांगण्यावरून तुम्ही एका बुजगावण्याला निवडून दिलं, त्याबद्दल मी यवतमाळच्या जनतेची माफी मागतो. यांनी मतदारांच्या विश्वासाला काळं फासलं आहे. भाजप आता रेशन कार्ड, आधार कार्डपेक्षा पक्षाचं सदस्यत्व श्रेष्ठ मानत आहे. अशाच हुकूमशाही पद्धतीने वागले, तर हा भारतीय जनता पक्ष नाही, तर 'पाकिस्तान जनता पक्ष' होतोय की काय, अशी भीती वाटायला लागली आहे,' असा घणाघात ठाकरेंनी केला.

### आईची खोटी शपथ

बंडखोर खासदाराने आधी आईची शपथ घेऊन 'ठाकरेंसोबतच राहणार' असं सांगितलं होतं, ती क्लिप सभेत ऐकवून ठाकरेंनी त्यांचा खोटारडेपणा उघडा पाडला.

### राजीनामा देऊन दाखवा

'हिंमत असेल तर खासदारकीचा राजीनामा द्या आणि मशालीच्या चिन्हाशिवाय पुन्हा जनतेसमोर उभे राहून दाखवा,' असे थेट आव्हान संजय राऊतांनी दिले.

### जनतेचा स्वाभिमान जागा

खासदार गेला तरी मूळ घट्ट असून यवतमाळचा निष्ठावान शिवसैनिक गद्दारांना धडा शिकवण्यासाठी सज्ज असल्याचा निर्धार स्थानिक नेत्यांनी व्यक्त केला.

### अयोध्येतील चोरीनंतर भाजपमुक्त राम


'भाजपमुक्त राम' आंदोलनाची घोषणाराम मंदिराच्या मुद्द्यावरून भाजपवर हल्ला करताना ठाकरे म्हणाले, 'राम मंदिराच्या दानपेटीतले पैसे आणि चांदीच्या विटा चोरणाऱ्यांसोबत हे गद्दार बूट चाटायला गेले आहेत. हा हिंदुत्वाचा घोर अपमान आहे. प्रभू श्रीरामाला या भोंदू हिंदूंच्या गराड्यातून सोडवण्यासाठी शिवसेना लवकरच संपूर्ण महाराष्ट्रात 'भाजपमुक्त राम' आंदोलनाची पहिली ठिणगी टाकणार आहे!' असा ठाम विश्वास उध्दव ठाकरे यांनी व्यक्त केला.

# टीईटी परीक्षेचा पेपर ठाण्यात फुटला ?

प्रतिनिधी २७ जून

**मुंबईः** राज्यातील शिक्षक पात्रता परीक्षा (TET) पुन्हा एकदा पेपरफुटीच्या वादात अडकली आहे. ठाणे जिल्ह्यात उद्या होणाऱ्या टीईटी परीक्षेची प्रश्नपत्रिका आधीच बाहेर आल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर मोठी कारवाई करण्यात आली. या पार्श्वभूमीवर उद्या होणारी परीक्षा स्थगित करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, परीक्षेच्या आदल्या दिवशीच काही जण पैसे घेऊन प्रश्नपत्रिका वाटत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी सापळा रचून कारवाई केली. या कारवाईदरम्यान प्रश्नपत्रिका जप्त करण्यात आल्याचा दावा केला जात असून, काही संशयितांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.या घटनेची माहिती तातडीने शिक्षण विभागाला देण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी



**TET रद्द**

परीक्षा स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

सध्या शिक्षण विभागाकडून अधिकृत परिपत्रक जारी होण्याची प्रतीक्षा आहे. मात्र पेपरफुटीची माहिती प्राथमिक स्तरावर निश्चित झाल्यामुळे परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. नवीन परीक्षा कधी घेतली जाणार, याबाबतचा निर्णय नंतर जाहीर केला जाईल. या प्रकरणात पोलिसांनी काही जणांना ताब्यात घेतले आहे. हे संशयित नेमके कोण आहेत, त्यांचा कोचिंग क्लास किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक संस्थांशी संबंध आहे का, प्रश्नपत्रिका त्यांच्यापर्यंत कशी पोहोचली, याचा तपास सुरू आहे. पेपरफुटीचे संपूर्ण रॅकेट उघड करण्यासाठी पोलिसांकडून सखोल चौकशी केली जात असून, या प्रकरणात आणखी अटक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या परीक्षेची अनेक विद्यार्थ्यांनी महिनोनमहिने तयारी केली होती. परीक्षेच्या अवघ्या काही तास आधी ती स्थगित झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये मोठी निराशा पसरली आहे. आता नव्या तारखेची प्रतीक्षा त्यांना करावी लागणार आहे.मागील काही वर्षांत विविध स्पर्धा परीक्षा आणि भरती परीक्षांमध्ये पेपरफुटीच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. त्यामुळे परीक्षा व्यवस्थेवर सातत्याने प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. टीईटीसारख्या महत्त्वाच्या परीक्षेत पुन्हा एकदा अशी घटना घडल्याने परीक्षा प्रक्रियेच्या सुरक्षिततेबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे.

# केतन अग्रवाल प्रकरण; उज्ज्वल निकम लढवणार खटला !

प्रतिनिधी २७ जून

**पुणे :** पुण्यातील बहुचर्चित केतन अग्रवाल हत्या प्रकरणाला आता न्यायालयीन लढाईच्या पातळीवर एक वेगळे वळण मिळाले आहे. या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी सिया गोयल हिच्याविरुद्ध पोलिसांकडे कोणताही स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी किंवा ठोस पुरावा उपलब्ध नसल्याचा मोठा दावा बचाव पक्षाने केला असल्याची माहिती समोर आली आहे.

केतन अग्रवाल यांच्या कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी त्यांचे वडील विशाल अग्रवाल यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. अग्रवाल कुटुंबाने मुख्यमंत्र्यांकडे या प्रकरणात वरिष्ठ वकिलाची नियुक्ती करण्याची मागणी केली होती.

कुटुंबाच्या या विनंतीची दखल घेत, देशातील ज्येष्ठ विधीज्ञ अॅड. उज्ज्वल निकम यांनी या प्रकरणात 'विशेष सरकारी वकील' म्हणून काम पाहण्यास मान्यता दिली आहे.




# चंपत राय यांचा राजीनामा...!

प्रतिनिधी २७ जून

**अयोध्याः** श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्राचे महासचिव चंपत राय आणि विश्वस्त डॉ. अनिल मिश्रा यांनी दबावाखाली आपल्या पदाचा राजीनामा दिला. याची पटकथा ८ दिवसांपूर्वी हरिद्वारमध्ये लिहिली गेली. विश्व हिंदू परिषदेची १८ आणि १९ जून रोजी हरिद्वारमध्ये बैठक होती. यात अयोध्येतून चंपत राय आणि गोपाल राव सहभागी झाले होते.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबाळे यांनी दोघांकडून राम मंदिरातील देणगी चोरीची माहिती घेतली. देणगीच्या हिशोबात हेराफेरी केल्याबद्दल दोघांनाही फटकारले होते. बैठकीनंतर चंपत राय यांच्यावरील दबाव वाढू लागला.

# तर राज़ीनामा द्या अन् संघात जा !

## विश्वास नांगरे पाटलांवर राज ठाकरेंचा घणाघात

प्रतिनिधी २७ जून

**मुंबईः** नागपूरचे नवनियुक्त पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या एका कार्यक्रमाला हजेरी लावत संघाची स्तुती केल्याने राज्यात मोठा वाद निर्माण झाला आहे. याप्रकरणी काँग्रेसने 'ऑल इंडिया सर्व्हिसेस कंडक्ट रुल्स'चा (सेवा नियमांचा) दाखला देत आधीच तीव्र आक्षेप नोंदवला होता. आता या वादात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी उडी घेतली असून, त्यांनी नांगरे पाटील यांच्यासह राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री असलेल्या फडणवीसांवरही सडकून टीका केली आहे. 'तुम्हाला संघाबद्दल आपुलकी असेल तर सेवेचा राजीनामा द्या आणि संघात किंवा भाजपमध्ये सामील व्हा,' असा थेट सल्ला राज ठाकरेंनी दिला आहे.राज ठाकरे यांनी विश्वास नांगरे पाटील यांच्या 'दुहेरी निष्ठे'वर कडक शब्दांत ताशेरे ओढले. ते म्हणाले, 'एक पोलीस अधिकारी म्हणून नांगरे पाटलांची निष्ठा फक्त आणि फक्त पोलीस दलाच्या कर्तव्याशी असायला हवी. पण त्यांना त्यांची संघाशी असलेली निष्ठा दाखवावीशी वाटत आहे. सध्या भरवली जाणारी हिंदू संमेलने अराजकीय असल्याचा देखावा केला जात असला, तरी ती राजकीयच आहेत.



सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा

शनिवार दि. २७ जून २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

# यशाची खरी व्याख्या काय?

यश म्हणजे केवळ पैसा किंवा प्रसिद्धी नव्हे, तर समाजासाठी केलेले योगदान आणि रोजगारनिर्मिती आहे, असे मत राधिका अंबानी यांनी एका कार्यक्रमात विद्यार्थ्यांशी संवाद साधताना व्यक्त केले. अपयशाच्या भीतीवर मात करण्यासाठी आत्मविश्वासाबरोबरच छोटे-छोटे निर्णय घेऊन कृती करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. स्त्री-पुरुष समानतेसाठी महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाबरोबरच पुरुषांमध्येही योग्य जाणीव निर्माण होणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच सोशल मीडियाच्या ध्रुवीकरणाच्या काळात विविध मतांचा आदर करत सहिष्णुता जपणे आणि जागतिक दृष्टिकोन स्वीकारताना आपल्या संस्कृतीशी व मूल्यांशी नाळ जोडून ठेवणे आवश्यक असल्याचा मोलाचा संदेश त्यांनी दिला.

# महाकर्जमुक्तीचा ऐतिहासिक निर्णय

शेतकरी राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहेत. अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी व महापूर यांसारख्या नैसर्गिक संकटांमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तसेच त्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध होऊन कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने सर्वात मोठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६ जाहीर करुन शेतकरी बांधवांना कर्जमुक्ती देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. या महत्त्वपूर्ण योजनेस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना हे नाव देऊन शासनाने त्यांच्या कार्याला अभिवादन केले आहे. शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी राज्य शासनाने यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७, महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ आणि महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजनेअंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजना २०२२ जाहीर करुन शेतकऱ्यांना वेळोवेळी भरीव मदत केली आहे.

राज्यातील शेतकरी कर्जमुक्तीनंतरही थकीत कर्जाच्या दुष्टचक्रामध्ये अडकत असल्याचे दिसून येते. शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून शेतकऱ्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून कायमस्वरुपी सोडवणूक करण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता म्हणून यादृष्टीने शिफारशी करण्यासाठी मुख्यमंत्री यांचे प्रमुख आर्थिक सल्लागार तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (मित्र) प्रविण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती गठीत केली होती.

या समितीने शेतकऱ्यांना कर्जमुक्तीची आवश्यकता, शेतकऱ्यांवर वारंवार कर्जमाफीची वेळ का येते? त्यांच्या उत्पन्नात स्थैर्य का निर्माण होत नाही? भविष्यात शेतकरी पुन्हा कर्जाच्या चक्रात अडकू नयेत, शेतकरी सक्षम व्हावा याबाबत अल्पकालीन आणि दीर्घकालीन अशा दोन्ही प्रकारच्या उपाययोजना सुचविलेल्या आहेत. मात्र तातडीचा दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' लागू करण्याचा



ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

यावेळी एक महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे आणि तो म्हणजे पूर्वी दोन लाख रुपयांच्या मर्यादेपेक्षा थोडी जास्त रक्कम कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना लाभ मिळत नव्हता, म्हणजे एकाद्या शेतकऱ्याचे दोन लाख दहा हजार कर्ज असेल तर तो शेतकरी अपात्र होता. आता मात्र अशा शेतकऱ्यांनी स्वतःचा हिस्सा भरल्यानंतर दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम शासन भरणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज मिळण्याचा मार्ग सुकर होणार आहे. तसेच यामध्ये जमीन धारणेची अट नाही. याशिवाय नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन लाभ देण्याची तरतूद करण्यात आली आहे. कर्जफेडीची शिस्त टिकवून ठेवण्यासाठी आणि प्रामाणिक कर्जदारांना प्रोत्साहन देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

एकवेळ समझोता योजना : १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२६ अखेर उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जखात्यांची एक किंवा अनेक बँकांकडील सर्व कर्ज खात्यांची मुद्दल व व्याजासह ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली एकत्रित थकबाकीची रक्कम दोन लाखांपेक्षा जास्त असेल अशा शेतकऱ्यांनी दोन लाखांवरील रक्कम भरल्यानंतर त्यांना लाभ मिळणार आहे. त्यामुळे प्रत्यक्षात शेतकऱ्यांना जी थकित रक्कम आहे त्यापेक्षा कमी रक्कम भरावी लागेल. विशेष म्हणजे अशा शेतकऱ्यांना त्यांच्या हिश्श्याची दोन लाखांवरील थकित रक्कम भरण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत कालावधी दिला जाणार आहे. नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या योजनेअंतर्गत २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ पैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षात पीक कर्जाची उचल करुन ३० जून पूर्वी किंवा बँकेच्या नियमानुसार विहित वेळेत कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रति शेतकरी रु. ५० हजार पर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. यासाठी २०२५-२६ व २०२६-२७ या आर्थिक वर्षांतील अल्पमुदत पीक कर्जाचीही वेळेत परतफेड करणे आवश्यक राहील. तसेच, २०२३-२४ अथवा २०२४-२५ या वर्षात पूर्णत: परतफेड केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची रक्कम ५० हजारांपेक्षा कमी असल्यास अशा शेतकऱ्यांना त्यांनी २०२३-२४ अथवा २०२४-२५ या वर्षात अल्प मुदत पीक कर्जाच्या मुद्दल व व्याजासह प्रत्यक्ष परतफेड केलेली रक्कम किंवा ५ हजार प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे.

पात्र शेतकऱ्यांना मुद्दल आणि व्याजासह प्रति शेतकरी २ लाख रुपयांपर्यंत थेट कर्जमुक्ती, १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जासाठी लागू. ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेल्या कर्जाचा समावेश, ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या कर्जाचा समावेश, पीक कर्जाचे मध्यम मुदत कर्जात पुनर्गठन/फेरपुनर्गठन केलेल्या थकीत हप्त्यांनाही २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती, २ लाख रुपयांपेक्षा जास्त कर्ज असल्यास अतिरिक्त रक्कम ३१ मार्च २०२७ पर्यंत संबंधित बँकेत जमा केल्यास कर्जमुक्तीचा लाभ, शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण करणे अनिवार्य आहे. राष्ट्रीयकृत, खाजगी, ग्रामीण, जिल्हा बँका व प्रा. कृषी पतपुरवठा संस्थांच्या कर्जाना लागू.

या योजनेचा लाभ सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना मिळणार असून सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांचे वितरण करण्यात येणार आहे. महाराष्ट्राच्या इतिहासातील ही सर्वात मोठी कर्जमुक्ती योजना ठरणार असून केवळ कर्जमाफी नाहीतर शेतकऱ्यांना आर्थिकदृष?ट्या सक्षम करणे त्यांचा आत्मविश्वास वाढवणे आणि शेती क्षेत्राला नवसंजीवनी देण्याचा उद्देश साध्य करण्याचा प्रयत्न या योजनेच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

काशीबाई थोरात
विभागीय संपर्क अधिकारी

# नव्या आयकर प्रणालीत मिळतात ५ टॅक्स बेनिफिट!

प्रत्येक करदात्याला सरकारने नवीन करप्रणाली आणि जुन्या करप्रणालीत निवडणं करण्याचा पर्याय दिला आहे. नव्या करप्रणालीत कमी कर दर आणि अनेक महत्त्वपूर्ण कर सवलती व वजावटी मिळतात. त्यामुळे तुम्ही अद्यापही आयटीआर दाखल केलेला नसेल तर नवीन करप्रणाली अंतर्गत असलेल्या ५ प्रमुख फायद्यांविषयी जाणून घेऊया. आयकर विवरणपत्र दाखल करण्याचा हंगाम सुरू झाला आहे. नोकरदार करदात्यांना आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी विवरणपत्र भरण्यासाठी ३१ जुलै २०२६ मुदत असून आयटीआर केवळ दाखल करण्याचे दस्तऐवज नाही तर गृहकर्ज, क्रेडिट कार्ड, वैयक्तिक कर्ज आणि व्हिसा यासारख्या अनेक महत्त्वाच्या कामांसाठी उत्पन्नाचा पुरावा म्हणूनही उपयोगी पडते.

**१) ७५,००० रुपयांची मानक वजावट**

नवीन करप्रणालीत करदात्यांना कोणतीही गुंतवणूक आणि कागदपत्रांशिवाय ७५००० रुपयांच्या मानक वाजवटीचा फायदा मिळतो. उदाहणार्थ एखाद्याचा वार्षिक पगार १४ लाख रुपये असेल तर ७५००० रुपये मानक वाजवटीसह करपात्र उत्पन्न १३.२५ लाख रुपये होईल.

**२) एनपीएस मधील नियोक्त्याच्या योगदानावर कर कपात**

एखादा नियोक्ता कर्मचाऱ्याच्या ञ्प्ए टियर-१ खात्यात योगदान देत असेल, तर आयकर कायद्याच्या कलम ८०ण्ण्ड(२) अंतर्गत मूळ वेतन आणि महागाई भत्त्याच्या १४ञ् पर्यंत कर कपातीचा दावा केला जाऊ शकतो, जो मानक कपातीव्यतिरिक्त आहे. मात्र ईपीएफ, एनपीएस आणि रिटायरमेंट फंडमधील नियोक्त्याचे एकूण योगदान वार्षिक ७.५ लाखांपेक्षा जास्त नसावे.

**३) कौटुंबिक निवृत्ती वेतनावर सवलत**

एखाद्याला कौटुंबिक निवृत्तीवेतन मिळत असेल तर, करदात्याला नव्या करप्रणालीत कर सवलतीचा फायदा मिळतो. यामध्ये २५,००० रुपये किंवा एकूण फॅमिली पेन्शनच्या एक-तृतीयांश (यापैकी जी रक्कम कमी असेल) इतकी कपात मिळू शकते.

**४) भाड्याने दिलेल्या घराच्या होम लोनवर कपात**

एखाद्या करदात्याने होम लोन घेतले आहे आणि भाड्याने दिले असेल तर, नव्या कर प्रणालीत कर्जाच्या व्याजावर कर कपातीचा दावा केला जाऊ शकतो. या प्रकरणात व्याज कपातीची कोणतीही कमाल मर्यादा नाही.

**५) अग्निवीर कॉर्पस फंडातील योगदानावर पूर्ण कपात :** आयकर कायद्याच्या कलम ८० सीसीएच अंतर्गत अग्निवीर कॉर्पस फंडातील योगदानावर अग्निवीरांना १००टक्के टॅक्समध्ये सूट मिळण्याचा अधिकार आहे. त्यामुळे आयकर विवरणपत्र भरण्यापूर्वी टॅक्स बेनिफीटबद्दल जाणून घेतल्यास पगारदार कर्मचाऱ्यांना कर विवरणपत्राचे अधिक चांगल्या प्रकारे नियोजन करण्यास आणि कपातींचा पुरेपूर फायदा घेणे शक्य होऊ शकते.

# शिक्षक मतदारसंघ निवडणूक- 2026 करीता कॉँग्रेस निर्णायक भूमिका घेणार का ?

अमरावती विभागातील कॉँग्रेस पक्षासाठी-२०२६ ची शिक्षक मतदारसंघ निवडणूक ही केवळ विधान परिषदेची निवडणूक नसून पक्षाच्या भवितव्याची कसोटी ठरणार आहे. एकेकाळी ग्रामीण ते शहरी भागात भक्कम जनाधार असलेल्या कॉँग्रेसला गेल्या काही वर्षांत सलग पराभव, संघटनात्मक दुर्बलता आणि अंतर्गत गटबाजीचा मोठा फटका बसला आहे. त्यामुळे पक्षाच्या राजकीय अस्तित्वाबाबत आणि भविष्यातील वाटचालीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत कॉँग्रेसचे उमेदवार बळवंत वानखेडे यांच्या विजयामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले होते. हा विजय कॉँग्रेसच्या पुनरागमनाची नांदी ठरेल, अशी अपेक्षा निर्माण झाली होती. मात्र त्यानंतर झालेल्या विधानसभा आणि विधान परिषद निवडणुकांतील अपयशाने त्या आशांवर पाणी फेरले. परिणामी, कॉँग्रेससमोर आता केवळ निवडणूक जिंकण्याचेच नव्हे, तर आपली हरवलेली विश्वासार्हता आणि संघटनात्मक ताकद पुन्हा उभारण्याचे मोठे आव्हान उभे आहे. पक्षाच्या वारंवार होणाऱ्या पराभवामागे केवळ विरोधकांची ताकद कारणीभूत नाही. त्यामागे कॉँग्रेसमधील अंतर्गत वास्तवही तितकेच जबाबदार आहे. शहर विरुद्ध ग्रामीण, गट विरुद्ध गट आणि नेते विरुद्ध नेते अशा संघर्षांमध्ये पक्षाची ऊर्जा खर्च होत आहे. संघटन वाढविण्याऐवजी अंतर्गत वादांमध्ये अडकलेल्या कॉँग्रेसमुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम आणि निराशा वाढत आहे. ठशहर कॉँग्रेसला ग्रामीण कॉँग्रेस चालत नाही आणि ग्रामीण कॉँग्रेसला शहर कॉँग्रेस चालत नाहीठ अशी भावना तळागाळात निर्माण होणे ही पक्षासाठी धोक्याची घंटा आहे. १८ जून २०२६ रोजी झालेल्या विधान परिषद निवडणुकीदरम्यान काही लोकप्रतिनिधींनी पक्षाच्या अधिकृत भूमिकेविरोधात मतदान केल्याचे आरोप झाले. हे आरोप सत्य असतील तर ते कॉँग्रेसमधील संघटनात्मक शिस्त आणि बांधिलकी किती कमकुवत झाली आहे, याचे स्पष्ट द्योतक आहे. अशा घटनांबाबत पक्षाने वेळेवर आणि ठाम भूमिका घेतली नाही तर कार्यकर्ते आणि जनतेमध्ये चुकीचा संदेश जाण्याची शक्यता आहे.

संघटनात्मक नियुक्त्यांबाबतही अनेक कार्यकर्त्यांमध्ये असंतोष आहे. पक्ष काही मोजक्या व्यक्तींभोवती केंद्रित झाल्याची भावना वाढत आहे. नव्या नेतृत्वाला संधी मिळत नसल्याने तरुण कार्यकर्त्यांमध्ये नाराजी आहे, तर वर्षानुवर्षे पक्षासाठी संघर्ष करणाऱ्या निष्ठावान कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना अधिक तीव्र झाली आहे. अशा परिस्थितीत ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२६ मध्ये होणारी शिक्षक मतदारसंघाची निवडणूक कॉँग्रेससाठी अत्यंत निर्णायक ठरणार आहे. ही निवडणूक केवळ एक जागा जिंकण्याची लढाई नाही; ती कॉँग्रेसच्या राजकीय पुनरुज्जीवनाची आणि हरवलेली प्रतिष्ठा परत मिळवण्याची सुवर्णसंधी आहे. गेल्या काही निवडणुकांतील पराभवाची धूळ झटकून नव्याने उभे राहण्यासाठी हा मतदारसंघ महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो.

मात्र त्यासाठी सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे तो उमेदवार निवडीचा आहे. कॉँग्रेस पुन्हा एखाद्या आयात उमेदवारावर विश्वास ठेवणार का? विविध पक्षांमध्ये वारंवार पक्षांतर करणारे, शैक्षणिक क्षेत्राशी थेट संबंध नसलेले किंवा केवळ आर्थिक ताकदीच्या जोरावर राजकारण करणारे चेहरे पुढे करून पक्षाला दीर्घकालीन फायदा होण्याची शक्यता कमी आहे. अशा प्रयोगांचे परिणाम कॉँग्रेसने यापूर्वीही अनुभवले आहेत.

शिक्षक मतदारसंघाचे स्वरूप इतर निवडणुकांपेक्षा वेगळे आहे. येथे मतदार सुशिक्षित, जागरूक आणि प्रश्न विचारणारे आहेत. त्यामुळे पैसा, प्रसिद्धी किंवा राजकीय समीकरणांपेक्षा शिक्षकांच्या प्रश्नांची जाण, शैक्षणिक क्षेत्रातील कार्य, वैचारिक स्पष्टता, सामाजिक स्वीकार्यता आणि नेतृत्व क्षमता अधिक महत्त्वाची ठरते. आज कॉँग्रेसला केवळ निवडणूक जिंकणारा उमेदवार तर हवा आहेच, पण सोबतच भविष्यात पक्ष उभारू शकणारे नेतृत्व हवे आहे. असे नेतृत्व जे निवडून आल्यानंतरही शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, युवक आणि समाजातील विविध घटकांना जोडून ठेवेल. पक्षाशी निष्ठा असलेले, संघर्षातून पुढे आलेले आणि संघटनात्मक क्षमता सिद्ध केलेले नेतृत्वच कॉँग्रेससाठी अधिक उपयुक्त ठरू शकते.

विशेष म्हणजे या निवडणुकीसाठी आता अवघे चार महिने शिल्लक आहेत. त्यामुळे कॉँग्रेसने आतापासूनच शिक्षक मेळावे, संवाद सभा, शिक्षण परिषद आणि विविध शिक्षक संघटनांशी चर्चा सुरू करणे आवश्यक आहे. समविचारी संघटना आणि गटांशी संवाद साधून व्यापक सहमती निर्माण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. निवडणूक जाहीर झाल्यानंतर नव्हे, तर त्यापूर्वीच वातावरणनिर्मिती करण्याची गरज आहे. कारण ही निवडणूक केवळ एका उमेदवाराची नसून कॉँग्रेसच्या भवितव्याची निवडणूक आहे. त्यासाठी नव्या नेतृत्वाला संधी देण्याचा वेळ आली आहे त्यासाठी कॉँग्रेस भूमिका घेणार का ?

समीर जवंजाळ
माजी सचिव, युवक कांग्रेस, महाराष्ट्र राज्य
९९२२० ३७७१५

# बॉलीवूड क्षेत्रातील सर्वश्रेष्ठ संगितकार आर डी बर्मन

राहुल देव बर्मन २७ जून १९३९ ४ जानेवारी १९९४ हे एक भारतीय संगीत दिग्दर्शक आणि गायक होते, ज्यांनाहिंदी चित्रपट संगीतउद्योगातील सर्वात महान आणि यशस्वी संगीत दिग्दर्शकांपैकी एक मानले जाते. १९६० च्या दशकापासून ते १९९० च्या दशकापर्यंत, बर्मन यांनी ३३१ चित्रपटांसाठी संगीत दिले आणि त्यांच्या रचनांनी संगीत समूहाला एका नवीन स्तरावर नेले. बर्मन यांनी किशोर कुमार, लता मंगेशकर, आशा भोसलेआणिमोहम्मद रफीदिग्गज गायकांसोबत मोठे काम केले. त्यांनी मजरूह सुलतानपुरी, आनंद बक्षीआणिगुलजारयांसारख्या गीतकारांसोबतही मोठ्या प्रमाणावर काम केले, ज्यांच्यासोबत त्यांनी आपल्या कारकिर्दीतील काही अविस्मरणीय गाणी तयार केली. 'पंचम', ते संगीतकारसचिन देव बर्मनआणि त्यांच्या बंगाली गीतकार पत्नी मीरा देव बर्मन यांचे एकुलते एक पुत्र होते. ते प्रामुख्याने हिंदी चित्रपटसृष्टीत संगीतकार म्हणून सक्रिय होते आणि त्यांनी काही रचनांसाठी गायनही केले. त्यांनी भारतीय संगीत दिग्दर्शकांच्या पुढच्या पिढीवर प्रभाव टाकला, आणि त्यांची गाणी भारतात आणि परदेशात लोकप्रिय आहेत. त्यांच्या मृत्यूनंतर बऱ्याच वर्षांनीही, त्यांची गाणी नवीन गायक आणि संगीतकारांना प्रेरणा देत राहिली.

**सुरुवातीचे जीवन आणि कारकिर्दीची सुरुवात :** बर्मन यांचा जन्म कलकत्ता येथे हिंदी चित्रपट संगीतकार आणि गायक सचिन देव बर्मन आणि त्यांच्या गीतकार पत्नी मीरा देव बर्मन (माहेरचे नाव दासगुप्ता) यांच्या पोटी झाला. सुरुवातीला, त्यांच्या आईच्या आईने त्यांना 'टुब्लू' हे टोपणनाव दिले होते, पण नंतर ते 'पंचम' या टोपणनावाने ओळखले जाऊ लागले. काही कथांनुसार, त्यांना 'पंचम' हे टोपणनाव मिळाले कारण, लहानपणी जेव्हा ते रडायचे, तेव्हा त्यांचा आवाज संगीत संकेतानुसार पाचव्या स्वरात ( पा ), म्हणजेच सी मेजर स्केलवरील जी नोटमध्ये यायचा; हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतामध्ये, 'पंचम' हे पाचव्या स्केल डिग्रीचे नाव आहे. आणखी एका सिद्धांतानुसार, ते बाळ पाच वेगवेगळ्या स्वरांमध्ये रडू शकत असल्यामुळे त्याला 'पंचम' हे टोपणनाव देण्यात आले. आणखी एक आवृत्ती अशी आहे की जेव्हा ज्येष्ठ भारतीय अभिनेते अशोक कुमार यांनी नवजात राहुलला वारंवार 'पा' हे अक्षर उच्चारताना पाहिले तेव्हा त्यांनी त्या मुलाचे नाव पंचम ठेवले.

बर्मन यांचे सुरुवातीचे शिक्षण पश्चिम बंगालमधील कोलकाता येथील बालीगंज गव्हर्नमेंट हायस्कूलमधून झाले . त्यांचे वडील एस. डी. बर्मन हे मुंबईस्थित हिंदी चित्रपटसृष्टीतील एक प्रख्यात संगीत दिग्दर्शक होते. वयाच्या सतराव्या वर्षी, आर. डी. बर्मन यांनी त्यांचे पहिले गाणे, ए मेरी टोपी पलट के आ संगीतबद्ध केले, जे त्यांच्या वडिलांनी 'फंटूश' (१९५६) या चित्रपटात वापरले . सर जो तेरा चक्राये या गाण्याची चाल देखील त्यांनी लहानपणीच संगीतबद्ध केली होती आणि त्यांच्या वडिलांनी गुरु दत्त यांच्या ' प्यासा ' (१९५७) चित्रपटाच्या साउंडट्रॅकमध्ये त्याचा समावेश केला होता .

मुंबईत, बर्मन यांनी उस्ताद अली अकबर खान ( सरोद ) आणि समता प्रसाद ( तबला ) यांच्याकडून प्रशिक्षण घेतले. ते सलील चौधरी यांनाही आपले गुरू मानत असत. त्यांनी आपल्या वडिलांचे सहाय्यक म्हणून काम केले आणि अनेकदा त्यांच्या ऑर्केस्ट्रामध्ये हार्मोनिका वाजवली.

बर्मन यांना संगीत सहाय्यक म्हणून श्रेय दिले गेलेले काही उल्लेखनीय चित्रपट म्हणजे चलती का नाम गाडी (१९५८), कागज के फूल, तेरे घर के सामने, बंदिनी, जिद्दी, मार्गदर्शक आणि तीन देवियन. बर्मन यांनी त्यांच्या वडिलांच्या हिट रचना है अपना दिल तो आवारासाठी माऊथ ऑर्गन देखील वाजवले, जे सोलवा साल चित्रपटात प्रदर्शित केले गेले होते आणि हेमंता मुखोपाध्याय यांनी गायले होते . १९५९ मध्ये, बर्मन यांनी गुरू दत्त यांचे सहाय्यक निरंजन दिग्दर्शित ' राझ' या चित्रपटासाठी संगीत दिग्दर्शक म्हणून करार केला . तथापि, हा चित्रपट कधीही पूर्ण झाला नाही. गुरू दत्त आणि वाहिदा रहमान अभिनीत या चित्रपटाचे गीत शैलेंद्र यांनी लिहिले होते . चित्रपट बंद पडण्यापूर्वी बर्मन यांनी त्यासाठी दोन गाणी रेकॉर्ड केली होती. पहिले गाणे गीता दत्त आणि आशा भोसले यांनी गायले होते, आणि दुसरे गाणे शमशाद बेगम यांनी गायले होते .

स्वतंत्र संगीत दिग्दर्शक म्हणून बर्मन यांचा पहिला प्रदर्शित चित्रपट 'छोटे नवाब' होता. जेव्हा प्रसिद्ध हिंदी चित्रपट विनोदी कलाकार मेहमूद यांनी 'छोटे नवाब'ची निर्मिती करण्याचे ठरवले , तेव्हा त्यांनी संगीतासाठी सर्वप्रथम बर्मन यांचे वडील सचिन देव बर्मन यांच्याशी संपर्क साधला. तथापि, एस. डी. बर्मन यांनी अनुपलब्ध असल्याचे सांगून ही ऑफर नाकारली. या भेटीदरम्यान, मेहमूद यांनी राहुलला तबला वाजवताना पाहिले आणि 'छोटे नवाब'साठी त्याला संगीत दिग्दर्शक म्हणून करारबद्ध केले नंतर बर्मन यांचे मेहमूद यांच्याशी घनिष्ठ संबंध निर्माण झाले आणि त्यांनी मेहमूद यांच्या 'भूत बंगला' या चित्रपटात एक छोटी भूमिका केली.



**वैयक्तिक जीवन :**

बर्मन यांची पहिली पत्नी रीटा पटेल होत्या, ज्यांना ते दार्जिलिंगमध्ये भेटले होते . रीटा, एक चाहती असल्याने, तिने तिच्या मैत्रिणींसोबत पैज लावली होती की तिला बर्मनसोबत चित्रपटासाठी डेट मिळेल. त्या दोघांनी १९६६ मध्ये लग्न केले आणि १९७१ मध्ये घटस्फोट घेतला. विभक्त झाल्यानंतर ते एका हॉटेलमध्ये असताना त्यांनी 'परिचय ' मधील 'मुसाफिर हूँ यारों मी एक प्रवासी आहे हे गाणे संगीतबद्ध केले होते. त्यांच्या आईचा या नात्याला तीव्र विरोध असूनही, बर्मन यांनी दीर्घकाळ चाललेल्या प्रेमसंबंधानंतर १९८० मध्ये आशा भोसले यांच्याशी लग्न केले. या जोडप्याने एकत्र अनेक हिट गाणी रेकॉर्ड केली आणि अनेक लाईव्ह परफॉर्मन्सही सादर केले. तथापि, त्यांच्या आयुष्याच्या अखेरीस ते एकत्र राहत नव्हते. बर्मन यांना, विशेषतः त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात, आर्थिक अडचणी होत्या. त्यांच्या मृत्यूनंतर तेरा वर्षांनी, २००७ मध्ये त्यांच्या आई मीरा यांचे निधन झाले. आपल्या मुलाच्या मृत्यूपूर्वीपासूनच त्या अल्झायमरने ग्रस्त होत्या. त्यांच्या मृत्यूपूर्वी काही काळ आधी त्यांना एका वृद्धाश्रमात हलवण्यात आले होते आणि हे प्रकरण वादग्रस्त ठरल्यानंतर त्या पुन्हा आपल्या मुलाच्या घरी परतल्या. आर. डी. बर्मन यांचे ४ जानेवारी १९९४ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. बर्मन त्यांच्या मृत्यूपूर्वी सुमारे सहा वर्षे हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधीच्या आजाराने त्रस्त होते आणि १९८८ मध्ये आलेल्या हृदयविकाराच्या झटक्यामुळे त्यांच्यावर शस्त्रक्रियाही झाली होती.

**संगीत कारकीर्द १९६१ १९७५ सुरुवातीची कारकीर्द आणि प्रसिद्धीचा उदय**

आरडी बर्मन यांनी संगीत दिग्दर्शक म्हणून १९६१ मध्ये आलेल्या छोटे नवाब या चित्रपटाद्वारे त्यांच्या कारकिर्दीची सुरुवात केली , जो कि एक यशस्वी ठरला आणि त्याचप्रमाणे त्यांचे पुढील तीन उपक्रम, भूत बंगला, तीसरा कौन आणि पति पटनी हे होते. त्यांनी विजय आनंदच्या संगीतमय रहस्यमय चित्रपट तीसरी मंझिल द्वारे स्वतः ला स्थापित केले, ज्यात शम्मी कपूर आणि आशा पारेख मुख्य भूमिकेत होते. हे बॉक्स ऑफिसवर प्रचंड यश मिळवून गेले, ज्याचे श्रेय त्याच्या सुपरहिट गाण्यांना देण्यात आले, ओ हसिना जुल्फोंवाली जाने जहाँ, ओ मेरे सोना रे सोना, आजा आजा मैं हूं प्यार तेरा, दीवाना मुझसा नहीं आणि तुमने मुझे देखा या वर्षाच्या शेवटच्या वर्षाच्या मेहेरच्या वार्षिक वैशिष्ट्यांपैकी एक होते . गीतमाला . याव्यतिरिक्त, तिसरी मंझिलचा साउंडट्रॅक १९६० च्या दशकातील सातवा सर्वाधिक विकला जाणारा हिंदी चित्रपट अल्बम ठरला. बर्मन यांचे त्या दशकातील दुसरे उल्लेखनीय काम म्हणजे ' पडोसन' या संगीतप्रधान विनोदी चित्रपटाचे संगीत होते , ज्यातील एक चतुर नार, मेरे सामने वाली खिडकी में, मेरे भोले बलम आणि कहना है कहना है यांसारखी गाणी आजही लोकप्रिय आहेत आणि चित्रपटाला व्यावसायिक यश मिळवून देण्यात त्यांनी मोठी भूमिका बजावली. १९६९ मध्ये, त्यांनी 'वारिस' आणि 'प्यार का मौसम' या दोन यशस्वी चित्रपटांसाठी संगीत दिले आणि शक्ती सामंता यांच्या ' आराधना' चित्रपटात वडिलांचे सहाय्यक म्हणून काम करत असताना , त्यांनी किशोर कुमार यांना राजेश खन्ना यांचा पार्श्वगायक बनवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली , जे चित्रपटाच्या ब्लॉकबस्टर यशाने सुपरस्टार बनले. कुमार यांच्या गायन कारकिर्दीलाही चालना मिळाली आणि ते हिंदी चित्रपटसृष्टीतील आघाडीचे पार्श्वगायक बनले आणि १९८७ मध्ये त्यांच्या मृत्यूपर्यंत त्याच पदावर राहिले.

बर्मन १९७० साली शक्ती सामंता दिग्दर्शित , राजेश खन्ना आणि आशा पारेख अभिनीत ' कटी पतंग' या संगीतप्रधान रोमँटिक ड्रामाद्वारे हिंदी चित्रपटसृष्टीतील आघाडीचे संगीत दिग्दर्शक म्हणून उदयास आले . बॉक्स ऑफिसवर हा चित्रपट ब्लॉकबस्टर ठरला, तर 'ये शाम मस्तानी', ' प्यार दीवाना होता है ', 'ये जो मोहब्बत है' आणि 'जिस गली में तेरा घर' यांसारखी त्याची जवळपास सर्वच गाणी चार्टबस्टर ठरली आणि चित्रपटाच्या बॉक्स ऑफिस यशात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्याचे साउंडट्रॅक १ ९७० च्या दशकातील सर्वाधिक विक्री होणाऱ्या बॉलीवूड साउंडट्रॅकपैकी एक बनले. त्याच वर्षी, त्यांनी राजेश खन्नाच्या आणखी एका हिट चित्रपट ' द ट्रेन'साठी संगीत दिले, ज्यात मोहम्मद रफी यांचे एकल गीत 'गुलाबी आँखें' आणि लता मंगेशकर यांचे एकल गीत 'किस लिए मैंने प्यार किया' ही लोकप्रिय गाणी होती .

सिटी न्यूज अकोला

शनिवार दि. २७ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# संरक्षण अधिकारी तसेच एकात्मिक बाल विकास कार्यालयाची दुरवस्था

## पावसाचे पाणी शिरल्याने कामकाज विस्कळीत

प्रतिनिधी २७ जून

**अकोट :** महिला व बालविकास अधिकारी, अकोला कार्यालयांतर्गत येथील संरक्षण अधिकारी कार्यालय इमारतीची दुरवस्था झाली आहे. २३ जून रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे या कार्यालयात मोठ्या प्रमाणावर पावसाचे पाणी शिरले. यामुळे कार्यालयातील सर्व महत्त्वाचे दप्तर आणि दैनंदिन कामकाज पूर्णपणे विस्कळीत झाले असून, हे कार्यालय सध्या समस्यांचे माहेरघर बनले आहे.

संरक्षण अधिकारी कार्यालयामार्फत 'कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५' अंतर्गत पीडित महिलांची प्रकरणे न्यायालयात दाखल करणे, न्यायालयीन आदेश व नोटिसींची पूर्तता करणे तसेच महिलांना विविध कायदेशीर सुविधा उपलब्ध करून देणे यांसारखी अत्यंत महत्त्वाची व संवेदनशील कामे केली जातात. मात्र, कार्यालयात वारंवार पाणी शिरत असल्याने या संवेदनशील कामकाजावर अत्यंत प्रतिकूल परिणाम होत आहे



कार्यालयाच्या या जीर्ण अवस्थेबाबत विचारणा केली असता, धक्कादायक माहिती समोर आली आहे. ऑगस्ट २०२५ तसेच २०२६ मध्येही संबंधित वरिष्ठ जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, अकोला यांना या समस्येबाबत लेखी स्वरूपात कळविण्यात आले आहे. वरिष्ठांकडून आदेश प्राप्त झाल्यानंतरच कार्यालयाचे स्थलांतर करण्यात येईल, असे येथील अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. पायाभूत सुविधांचा अभाव आणि सुरक्षेचा प्रश्नकार्यालयात वारंवार पाणी शिरत असल्याने पीडित महिलांना येथे पुरेशा सुविधा आणि समाधानकारक बैठक व्यवस्था उपलब्ध होत नाही. परिणामी, येथे येणाऱ्या महिला व बालकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेष म्हणजे, यापूर्वी २०२५ मध्येही दोन ते तीन वेळा कार्यालयात पाणी शिरण्याच्या घटना घडल्या होत्या. व दोन तीन वेळा विषारी साप देखील या कार्यालयात दिसून आला तसेच, इमारतीच्या निकृष्ट अवस्थेमुळे काही महिन्यांपूर्वी एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात शॉर्टसर्किटमुळे आग लागण्याची घटनाही घडली होती. या पार्श्वभूमीवर इमारतीची सुरक्षितता आणि कार्यालयीन कामकाजावर होणारा परिणाम हा चिंतेचा विषय बनला आहे. सध्या या कार्यालयात 'लाडकी बहीण योजने'चे काम मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. एकात्मिक बाल विकास विभागाचे हे काम अत्यंत महत्त्वाचे असताना, कार्यालयात साचलेले पाणी आणि अव्यवस्थेमुळे कर्मचाऱ्यांना व येथे येणाऱ्या भगिनींना प्रचंड त्रासाचा सामना करावा लागत आहे. या दलदलीतूनच कर्मचाऱ्यांना ये-जा करावी लागत आहे.

# प्रीपेड स्मार्ट मीटरच्या विरोधात जन आक्रोश मोर्चा

प्रतिनिधी २७ जून




**मुर्तीजापुर :** मुर्तीजापुर तालुक्याच्या वतीने प्रीपेड स्मार्ट मीटर च्या विरोधात जन आक्रोश मोर्चा उपविभागीय अधिकारी कार्यालयावर काढण्यात आला.

समाजसेवक कृष्णराव गावंडे व अहमद खान उर्फ अम्मू यांच्या नेतृत्वात तालुक्यातील स्मार्ट मीटरमुळे वैतागलेले नागरिक मोर्चात मोठ्या प्रमाणात सहभागी झाले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करून स्टेशन परिसरातून स्मार्ट मीटरच्या विरोधात मोर्चाला सुरुवात झाली.

स्मार्ट मीटर बसविणे हे बंधनकारक नसून ग्राहकांनी स्वतःहून मागणी केल्याशिवाय व त्याची संमती घेऊनच स्मार्ट मीटर लावल्या जाईल असे १७/६/२०२६ वीस महावितरण कंपनीने नागपूर खंडपीठाला सांगितले असतानाही मोठ्या प्रमाणात तालुक्यात मजूर शेतकरी यांच्यावर अन्याय करून न संमती घेता मोठ्या प्रमाणात स्मार्ट मीटर लावण्यात आले आहे हे आम्ही खपवून घेणार नाही असाही इशारा या निवेदनाच्या माध्यमातून देण्यात आला.

सोनोरी गावात जबरीने स्मार्ट मीटर बसविण्यात आले या गावाच्या लोकांनी सर्वप्रथम एकत्र येऊन याचा विरोध दर्शविला होता. उपविभागीय अधिकारी यांचे प्रतिनिधी म्हणून नायब तहसीलदार रवी राऊत यांचे सविस्तर चर्चा करून निवेदन दिले.

यावेळी तालुक्यातील पोलीस पाटील बाशिद पटेल, भुजंगराव येदवर, मोहम्मद साजिद, सचिन तायडे, साहेबराव इंगळे, रऊफ मौलाना, इस्माईल शहा, तसवर खान, शे शोएब, सागर जुमळे, अरबाज खान, मंगेश गावंडे, अज्जू इंगळे, मोहम्मद नईम, एहफाज खान, शेख अरबाज, मोबीन शहा, अफजल शहा, शे अशफाक, मोहम्मद शहीद, शेख कय्युम, नारायण शिंदे सह तालुक्यातील नागरिक मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. ठाणेदार जोशी यांच्या मार्गदर्शनात पोलिसांचा बंदोबस्त होता.

# 'गीत गोविंद' ने रसिकांना केले मंत्रमुग्ध

**अकोला :** संस्कार भारती आणि श्री ज्ञानेश्वर मंदिर संस्थान, जुने शहर च्या संयुक्त विद्यमाने ज्ञानेश्वर नगर, येथील पसायदान सभागृहात कृष्णचरित्र आणि कृष्णलीलांवर आधारित 'गीत गोविंद' हा आगळावेगळा संगीत कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. सूर, ताल, लय, नृत्य आणि प्रभावी निवेदन यांचा सुंदर मिलाफ असलेल्या या कार्यक्रमाने उपस्थित रसिकांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमात भगवान श्रीकृष्णाच्या जन्मापासून कंसवधापर्यंतच्या जीवनप्रवासाचे गीत, संगीत आणि नृत्याच्या माध्यमातून प्रभावी सादरीकरण दहीहंडी, कालियामर्दन गोवर्धन करण्यात आले. कृष्णजन्म, पूजा, कृष्णाच्या बाललीला आणि कंसवध यासारखे प्रसंग भावपूर्ण गीतांमधून आणि साभिनय नृत्यातून उभे करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि संस्कार भारतीच्या निवेदन आशा खोकले यांनी केले. कार्यक्रमात प्रिया माई, स्नेहल वाईकर आणि रेखा भटुरकर यांनी गीतांचे सादरीकरण केले.

# सोशल मीडियावरील आक्षेपार्ह व्हिडिओप्रकरणी आलेगाव पोलीस चौकी निवेदन देण्यात आले




प्रतिनिधी २७ जून

**आलेगाव :** सोशल मीडियावर मुस्लिम धर्म, समाज तसेच पैगंबर मोहम्मद साहेब आणि त्यांच्या पत्नी यांच्याविषयी कथित आक्षेपार्ह व समाजात तेढ निर्माण करणारे व्हिडिओ प्रसारित केल्याप्रकरणी संबंधित महिलेविरोधात आलेगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आलेगाव येथील मुस्लिम समाजच्या वतीने ही तक्रार देण्यात आली आहे. तक्रारीत नमूद केल्यानुसार, नाजिया इलाही खान या महिलेने सोशल मीडियावर मुस्लिम धर्म, पैगंबर मोहम्मद साहेब तसेच त्यांच्या पत्नी यांच्याबाबत कथित खोटे, काल्पनिक व आक्षेपार्ह वक्तव्य करत व्हिडिओ प्रसारित केले असून त्यामुळे धार्मिक भावना दुखावल्या गेल्या असून समाजात तेढ निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. तक्रारदारांनी संबंधित महिलेविरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई करून गुन्हा दाखल करण्याची मागणी चान्नी पोलीस स्टेशनचे थानेदार गंगाधर दराडे यांच्याकडे निवेदन स्वप्नात आला आहे कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती मिळाली आहे.निवेदन देताना हाफिज जुबेर, इमरान खान मुमताज खान, सैय्यद मुसीब, सलीम भाई, सैय्यद अफजल, मोइझोद्दीन, कय्युम मिस्त्री, एड शोएब, जफर सर, रऊफ खान, परवेज़ खान सह मोठ्या संख्येने मुस्लिम समाजातील नागरिक उपस्थित होते.

# पोलिस अधीक्षकांनी केला बॉक्सिंगपटू मोईन खानचा सत्कार

प्रतिनिधी २७ जून

**अकोला :** जळगाव जिल्ह्यातील पाळधी येथे दि. ११ ते १५ जून २०२६ दरम्यान आयोजित महाराष्ट्र राज्यस्तरीय प्रथम किक बॉक्सिंग स्पर्धेत अकोल्याच्या मोईन खान याने ४६ ते ४८ किलो वजन गटात उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत कांस्यपदक पटकावले. या उल्लेखनीय यशामुळे अकोला जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रात अभिमानाची भर पडली आहे.

या यशाबद्दल अकोला जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक यांच्या हस्ते मोईन खान यांचा पुष्पगुच्छ व प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी मोईन खानच्या जिद्द, मेहनत आणि क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीचे कौतुक करत भविष्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरही यश संपादन करण्यासाठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी श्री. कमलेश भरणे यांची प्रमुख उपस्थिती होती. मोईन खानच्या या यशामागे आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग कोच डॉ. सतीशचंद्र भट, तसेच प्रशिक्षक गजानन कबीर, आदित्य मने आणि



योगेश निषाद यांचे अथक परिश्रम, शिस्तबद्ध प्रशिक्षण आणि खेळाडूला दिलेले सातत्यपूर्ण मार्गदर्शन मोलाचे ठरले. प्रशिक्षकांच्या कुशल मार्गदर्शनासोबतच मोईन खानची जिद्द, चिकाटी आणि कठोर मेहनत यामुळे हे यश शक्य झाले आहे. या कामगिरीमुळे अकोला जिल्ह्यातील बॉक्सिंग खेळाला नवी उभारी मिळाली असून, उदयोन्मुख खेळाडूंना प्रेरणा मिळत आहे. मोईन खान, त्याचे प्रशिक्षक तसेच त्याचे आई-वडील यांच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या कार्याचे कौतुक केले जात आहे. भविष्यातही मोईन खान राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अकोला जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करेल, असा विश्वास क्रीडाप्रेमींनी व्यक्त केला आहे.

# विजेचा शॉक लागलेल्या युवकाचे प्राण वाचविले

## संजय नाईक यांचा माणुसकीचा धर्म

**मुर्तीजापुर :** चिखली गेट येथे घराचा काम करताना विजेचा शॉक लागलेले बेशुद्ध पडलेले युवकाचे प्राण वाचविण्यासाठी यश आले

आकाश आकाराम पेंन्डोरे राहणार सालतवाडा शिकली गेट येथे घराचा काम करत असताना सदर युवकाला ग्यारा किवीचा करंट लागल्याने तो बेशुद्ध होऊन खाली पडला आणि गंभीर जखमी झाला घटनावेळी वंचित बहुजन आघाडीचे माजी तालुकाध्यक्ष संजय नाईक घटनास्थळी पोहोचले. संजय नाईक यांनी तातडीने सदर युवकाला उचलून आपल्या गाडीत आणून तातडीने उपचारासाठी लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा रुग्णालय येथे भरती केले. सकाळची वेळ असताना



मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतुकीची गर्दी वाढली होती. गाडी वेगाने चालवून गंभीर जखमी असलेले आकाशवर तातडीने वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजेंद्र नेमाडे व डॉ. रेहान चाऊस तातडीने उपचार सुरू केले. युवकाला वेळेवर उपचार मिळाला म्हणून युवकाचे प्राण वाचले. गंभीर जखमी युवकाचा लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा रुग्णालय येथे उपचार सुरू आहे.

# श्री संत गजानन महाराज पालखीचे ग्रामीण आयुर्वेद महाविद्यालयात उत्स्फूर्त स्वागत



प्रतिनिधी २७ जून

**पातूर :** श्री संत गजानन महाराज यांच्या पवित्र पालखीचे पातूर येथील ग्रामीण आयुर्वेद महाविद्यालयात भक्तिमय वातावरणात भव्य स्वागत करण्यात आले.

यावेळी पालखीचे विधिवत पूजन करून श्रींच्या चरणी प्रार्थना करण्यात आली.

या प्रसंगी संस्थेचे संचालक साजिद तसेच प्राचार्य डॉ. भुस्कुटे, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी मोठ्या श्रद्धाभावाने पालखीचे स्वागत केले. भाविकांसाठी फळांचे वाटप करून प्रसादाची व्यवस्था करण्यात आली. पालखी आगमनामुळे महाविद्यालय परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. श्री संत गजानन महाराजांच्या जयघोषात आणि भजन-कीर्तनाच्या वातावरणात पालखीचे स्वागत करण्यात आले. यावेळी उपस्थित भाविकांनी महाराजांचे दर्शन घेऊन आशीर्वाद प्राप्त केले. या स्वागत सोहळ्यामुळे महाविद्यालय परिसरात धार्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

# विदर्भ चेम्बर ऑफ कॉमर्स अॅन्ड इंडस्ट्री अकोलाची रविवारी ९२ वी वार्षिक आमसभा

प्रतिनिधी २७ जून

**अकोला :** विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज अकोलाची ९२ वी वार्षिक आमसभा रविवार, २८ जून रोजी पोलिस लॉन्स सभागृहात आयोजित करण्यात आली आहे.

नवी दिल्लीचे खासदार प्रविणजी खंडेलवाल, कॅटचे राष्ट्रीय अध्यक्ष बी.सी. भरतीयाजी



नागपूर, पद्मश्री कल्पनाजी सरोज चेअरपर्सन, मॅनेजींग डायरेक्टर कामानी ट्युब्स, मुंबई प्रमुख अतिथी राहणार आहेत.

सकाळी ९.३० वाजता बिझनेस सत्र तर १०.३० वाजेपासून मुख्य कार्यक्रम सुरू होईल. या प्रसंगी व्यापारी, उद्योजक आणि निमंत्रितानी उपस्थित राहावे असे आवाहन विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अकोलाचे अध्यक्ष निकेश गुप्ता, मानद सचिव निरव वोरा, वरिष्ठ उपाध्यक्ष सिध्दार्थ रुहाटिया, कनिष्ठ उपाध्यक्ष निखिल अग्रवाल, कोषाध्यक्ष किशोर बाछुका, सहसचिव किरीट मंत्री यांनी केले आहे.

# विद्यार्थ्यांना शाळा तर शेतकरी मजुरांना शेतात जाण्याची घाई, पावसामुळे शेती कामांना वेग

प्रतिनिधी २७ जून

**हिवरखेड :** परिसरात २३ जूनच्या दुपार पासून पावसाने जोरदार हजेरी लावल्याने शेतकऱ्यांनसह नागरिकांना दिलासा मिळाला, पावसाची सर्वत्र प्रतीक्षा करत होते, पाऊस लांबत असल्याचे सर्वत्र विविध चर्चा करायला लागले होते, शेवटी निसर्गाची वेगळीच किमया वरून राजा प्रसन्न झाला आणि



जोरदार पावसाची एन्ट्री झाली, पावसाचा सर्वत्र आनंद झाला आणि गावात एकीकडे शेती कामांना वेग आला, तर दुसरीकडे शाळा सुरू होण्याची वेळ जवळ आल्याने विद्यार्थी वर्गात शिकवणीसाठी जाण्याची घाई, तर मजुरांना मशागत करण्यासाठी शेतात जाण्याची घाई, असे चित्र गावात निर्माण झाले, पाऊस आल्याने झाडे झुडपे व सातपुडा पर्वतातील प्राण्यांनी सुद्धा आपली तहान भागवली असे म्हणणे वावगे ठरणार नाही, तसेचश्रावण मासा प्रयत सर्व परिसर हिरवा व जलमय दिसून येईल.

# महान जलशुद्धीकरण केंद्रातील ट्रान्सफॉर्मर तात्काळ दुरुस्त करा : निलेश देव

प्रतिनिधी २७ जून

**अकोला :** शहराच्या पाणीपुरवठ्याचा कणा असलेल्या महान जलशुद्धीकरण केंद्रातील ट्रान्सफॉर्मर बिघाडामुळे गेल्या चार दिवसांपासून संपूर्ण शहरातील पाणीपुरवठा पूर्णतः ठप्प झाला असून नागरिकांवर कृत्रिम पाणीटंचाईची वेळ आली आहे. या गंभीर परिस्थितीबाबत तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात तसेच भविष्यात अशा प्रकारचा प्रकार पुन्हा घडू नये यासाठी कायमस्वरूपी स्टँडबाय सुविधा उभारण्यात यावी, अशी मागणी निलेश देव, गटनेते वंचित बहुजन आघाडी तथा नगरसेवक अकोला यांनी केली आहे.

शहरात चार दिवसांपासून पाणीपुरवठा बंद असल्यामुळे आधीच विस्कळीत असलेले पाणी वेळापत्रक पूर्णपणे कोलमडले आहे. अनेक भागांमध्ये सहा दिवस, काही



भागांमध्ये आठ दिवस तर काही ठिकाणी दहा दिवसांपासून नागरिकांना पाणी मिळालेले नाही. नागरिकांची दैनंदिन जीवनशैली विस्कळीत झाली असून महिला, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि सर्वसामान्य कुटुंबांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. इतक्या मोठ्या शहराचा पाणीपुरवठा एकाच यंत्रणेवर अवलंबून ठेवणे अत्यंत धोकादायक असून महान जलशुद्धीकरण केंद्रामध्ये कायमस्वरूपी स्टँडबाय यंत्रणा, पर्यायी ट्रान्सफॉर्मर, बॅकअप विद्युत व्यवस्था आणि आपत्कालीन संचालन प्रणाली तातडीने उभारणे आवश्यक आहे. तसेच दरवर्षी होणाऱ्या वार्षिक देखभाल (मेंटेनन्स) कामांचे वैज्ञानिक व वेळबद्ध नियोजन करावे. एक्सप्रेस फीडर उपलब्ध असतानाही वारंवार वीजपुरवठा खंडित होणे ही गंभीर बाब असून यासंदर्भात महानगरपालिका, वीज वितरण कंपनी व संबंधित तांत्रिक विभागाची उच्चस्तरीय संयुक्त आढावा बैठक तात्काळ बोलावण्यात यावी.

अकोलेकर नागरिकांना कृत्रिम पाणीटंचाईचा सामना करावा लागणार नाही यासाठी तातडीने युद्धपातळीवर उपाययोजना राबविण्यात याव्यात, अन्यथा नागरिकांच्या तीव्र भावना लक्षात घेऊन पुढील लोकशाही मार्गाने आंदोलनाचा विचार करण्यात येईल असा इशारा निलेश देव यांनी दिला आहे.

# अकोट सक्षम सामाजिक संघटन व कृषी विभाग यांच्या संयुक्त पुढाकार

## ■ पाटसूल येथे भव्य शेतकरी मेळावा व
## ■ अत्याधुनिक शेतीवर मोलाचे मार्गदर्शन

प्रतिनिधी २७ जून

**अकोट :** शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती व्हावी आणि त्यांचे उत्पादन वाढावे या उद्देशाने सक्षम सामाजिक संघटन व कृषी विभाग अकोट यांच्या संयुक्त विद्यमाने श्री गुरुदेव सेवा आश्रम, पाटसूल येथे भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला परिसरातील शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.प्रमुख मार्गदर्शक म्हणूण लाभलेले कूलदिप देशमूख यांनी शेतकरी बाधंवाना खालील प्रमाणे मार्गदर्शन केले.

कृषी तज्ज्ञांनी आधुनिक शेती पद्धती, बीबीएफ तंत्रज्ञान आणि सुधारित बियाण्यांविषयी सविस्तर माहिती दिली. नियोजन बदलते



हवामान लक्षात घेऊन कमी खर्चात अधिक उत्पादन कसे घ्यावे, याचे प्रयोगात्मक मार्गदर्शन करण्यात आले.

कीड व्यवस्थापन: पिकांवरील कीड व रोगांचे नियंत्रण करण्यासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन (IPM) पद्धतीचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले.

सेंद्रिय शेती: जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्यासाठी सेंद्रिय शेतीचे महत्त्व आणि जैविक खतांच्या वापराबाबत शेतकऱ्यांना प्रवृत्त करण्यात आले शासकीय योजना: कृषी विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध अनुदानाच्या व योजनांच्या लाभाची माहिती उपस्थित अधिकाऱ्यांनी दिली. तसेच शेती विषय सर्व ऑनलाईन सेवा मोफत उपलब्ध होती या सेवाचा बऱ्याच शेतकरी बांधवांनी लाभ घेतला त्या नंतर शेतकरी मेळाव्या करती लालेल्या शेतकरी बाधंवाची स्नेह भोजनाची वेवस्था करण्यात आली होती.

या प्रसंगी सक्षम सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अनिकेत नाना पोतले तसेच कृषी अधिकारी ,सुखदास गाडेकर महराज आणि मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

> शेतकरी व शेती हे देशाचे आत्मा आहेत. शेतकरांसाठी काही तरी करावे जा मुळे त्यांचे उत्पादन व उत्पन्न वाडेल व ते प्रगत व समृद्ध होतील याच भावनेने या मेळ्यावयाचे आयोजन करण्यात आले होते
>
> **अनिकेत नानाभाऊ पोतले**
> अध्यक्ष, सक्षम सामाजिक संघटन

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ ५२२६

मॉ. गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय गायत्री नगर. अकोला

आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!

वैशिष्ट्ये :
1)अनुभवी शिक्षकवृंद
2)सुसज्ज पायाभूत ईमारत
3)दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
4)सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
5)आनंददायी शिक्षण पध्दती
6)CCTV ची सुविधा
7)कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
8)सुसज्ज प्रयोगशाळा

इयत्ता 1 ली ते 10 वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
1)इयत्ता 1 ली ते 8 वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
2)इयत्ता 1 ली ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
3)शालेय पोषण आहार



मॉं गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. 9921186715, 9511254959, 9421895790, 9960437366

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शनिवार, दि. २७ जून २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# जिल्ह्यात 66 टक्के पाऊस

प्रतिनिधी २७ जून

**यवतमाळ** : जिल्ह्यात मान्सूनने काही तालुक्यांत समाधानकारक हजेरी लावली असली, तरी एकूण पावसाची सरासरी अद्यापही अपेक्षेपेक्षा कमीच आहे. २७ जूनपर्यंत जिल्ह्यात सरासरी ९७.३ मिमी पावसाची नोंद झाली असून, ती जून महिन्याच्या सामान्य पावसाच्या केवळ ६६ टक्के आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत जिल्ह्यात १६०.२ मिमी पाऊस झाला होता.

जिल्ह्यातील झरी-जामनी तालुक्याने यंदा सर्वाधिक १४४.४ मिमी पावसाची नोंद करत जूनच्या सरासरीच्या १५२.१ टक्के पाऊस प्राप्त केला आहे. त्याखालोखाल नेर तालुक्यात १२६ मिमी (१०५.५ टक्के) आणि मारेगावमध्ये ११३.४ मिमी (९२.९ टक्के) पाऊस झाला आहे.

**ठळक बाबी**

- जिल्ह्यात सरासरी ९७.३ मिमी पाऊस; जूनच्या सरासरीच्या ६६ टक्के. झरी-जामनी तालुक्यात सर्वाधिक १४४.४ मिमी पाऊस. नेरमध्ये सरासरीपेक्षा अधिक पाऊस; १०५.५ टक्क्यांची नोंद. घाटंजी, केळापूर व महागाव तालुक्यांत पावसाची कमतरता कायम. यवतमाळ तालुक्यात एका दिवसात सर्वाधिक ५१.५ मिमी पाऊस.



वणी तालुक्यातही ११७.६ मिमी पावसाची नोंद झाली असून, तो सरासरीच्या ८५.१ टक्के आहे.

दुसरीकडे, घाटंजी आणि केळापूर तालुक्यांत अद्यापही पावसाची कमतरता जाणवत आहे. घाटंजीत केवळ ६८.७ मिमी (३८.९ टक्के), तर केळापूरमध्ये ७३.२ मिमी (४५.९ टक्के) पावसाची नोंद झाली आहे. महागाव तालुक्यातही सरासरीच्या ४६.२ टक्केच पाऊस झाला आहे.

शनिवारी सकाळपर्यंतच्या २४ तासांत यवतमाळ तालुक्यात सर्वाधिक ५१.५ मिमी पावसाची नोंद झाली. राळेगावमध्ये ४३.४ मिमी, झरी-जामनीमध्ये ४१.७ मिमी, तर मारेगावमध्ये २८.३ मिमी पाऊस झाला. वणी, केळापूर आणि घाटंजी तालुक्यांत मात्र किरकोळ पाऊस पडला.

अमरावती विभागात एकूण ८९.४ मिमी पावसाची नोंद झाली असून, ती सरासरीच्या ६७.३ टक्के आहे. जिल्ह्यात आगामी काही दिवसांत मान्सून सक्रिय राहिल्यास पावसाची तूट भरून निघण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## बँकेतून पैसे काढताच पाकीट लंपास

प्रतिनिधी २७ जून

**महागाव** : महागाव शहरातील स्टेट बँकेतून १५ हजार रुपये काढल्यानंतर एका नागरिकाच्या खिशातील पाकीट अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना गुरुवारी (२५ जून) घडली. या प्रकरणी महागाव पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दगडू माटाळकर यांनी स्टेट बँकेतून १५ हजार रुपये काढले होते. त्यानंतर घरकुल योजनेचे अनुदान खात्यात जमा झाले आहे का, याची माहिती घेण्यासाठी ते मध्यवर्ती बँकेत गेले. यावेळी गर्दीचा फायदा घेत अज्ञात व्यक्तीने त्यांच्या खिशातील पाकीट चोरून नेले. पाकिटात १५ हजार रुपयांची रोख रक्कम होती.

घटनेची माहिती मिळताच महागाव पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करून आरोपीचा शोध सुरू केला आहे.

या प्रकरणाचा तपास प्रभारी ठाणेदार सुनील अंभोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बीट जमादार एडतकर करीत आहेत. बँक परिसरात व्यवहार करताना नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## प्रेषितांच्या अवमानप्रकरणी संताप; कारवाईसाठी मुस्लिम समाजाचे निवेदन

प्रतिनिधी २७ जून



**पुसद** : सोशल मीडियावर प्रसारित झालेल्या एका कथित आक्षेपार्ह व्हिडिओच्या पार्श्वभूमीवर पुसद शहरातील मुस्लिम समाजाने तीव्र संताप व्यक्त करत संबंधित व्यक्तीविरुद्ध तातडीने कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. प्रेषित हजरत मुहम्मद आणि हजरत आयशा (र.अ.) यांच्याबाबत कथितरीत्या अवमानकारक वक्तव्ये केल्याचा आरोप असलेल्या नाझीया इलाही खान यांच्याविरोधात गुन्हा दाखल करून अटक करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

यासंदर्भात पुसद शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सेवानंद वानखेडे यांना मुस्लिम समाजाच्या वतीने निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात नमूद केल्यानुसार, सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील एका पॉडकास्ट आणि इन्स्टाग्रामवरील मुलाखतीमध्ये संबंधित व्यक्तीने इस्लाम धर्मातील श्रद्धास्थानांबाबत आक्षेपार्ह व धार्मिक भावना दुखावणारी विधाने केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

मुस्लिम समाजाच्या प्रतिनिधींनी या कथित वक्तव्यांमुळे धार्मिक भावना दुखावल्या गेल्याचे सांगत, व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात प्रसारित झाल्याने सामाजिक सलोखा आणि कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीने चिंता निर्माण झाल्याचे निवेदनात नमूद केले आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून भारतीय न्याय संहिता तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियमांतर्गत लागू असलेल्या तरतुदींनुसार संबंधित व्यक्तीविरुद्ध तातडीने गुन्हा दाखल करावा, अशी मागणी करण्यात आली. तसेच भविष्यात अशा प्रकारचे कथित आक्षेपार्ह व्हिडिओ प्रसारित होऊ नयेत, यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची आणि संबंधित सामग्री हटविण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

या मागणीला पाठिंबा दर्शवत अनेक नागरिकांनी निवेदनावर सह्या केल्या. यामध्ये सैय्यद इश्तियाक, सैय्यद जहीरोद्दीन, फिरोज खान, आकिब रिझवी, नवाज अली, अब्दुल सिद्दीक, सैय्यद समीर, फैजान अहमद, मोहम्मद सिद्दीक, सैय्यद हाशिर, हसनैन खान, शेख जुबेर, सैय्यद रहेबर, शाहरुख खान, शेख सद्दाम, अब्दुल अतीक, मोहम्मद अशफाक आणि सैय्यद शोएब यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

मुस्लिम समाजाने या प्रकरणात तातडीने आणि कठोर कायदेशीर कारवाई करून न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी पोलीस प्रशासनाकडे केली आहे.

## कामगार कल्याणमध्ये योग दीन साजरा

प्रतिनिधी २७ जून

**यवतमाळ** : महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या कामगार कल्याण केंद्र, जय भारत चौक, यवतमाळ यांच्या वतीने २१ जून २०२६ रोजी स्कूल ऑफ स्कॉलर्स, शुभम कॉलनी येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी योगेश्वर अर्बन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष दामोदर ठाकरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून योग प्रशिक्षक सुभोध राय, डागवार, ज्येष्ठ योग प्रशिक्षक तथा जाजू कॉलेजचे प्राचार्य सतीश उपरे, योग प्रशिक्षक संजय चौधरी, विठ्ठल थेते, मनोहर पिसे तसेच आंतरराष्ट्रीय योग प्रशिक्षक चिद्दरवार उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन, दीपप्रज्वलन आणि पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुण्यांनी योगाचे महत्त्व आणि निरोगी जीवनासाठी योगाची आवश्यकता याविषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर सतीश उपरे यांनी विविध योगासने आणि त्यांचे आरोग्यदायी फायदे प्रात्यक्षिकासह उपस्थितांना समजावून सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्र संचालक गजानन सोनटक्के यांनी केले. सूत्रसंचालन सविता पवार यांनी, तर आभार प्रदर्शन जिपकाटे यांनी केले. या योग दिन कार्यक्रमात सुमारे ५० पुरुष व महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

## भूमी अभिलेखच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह; मोजणीसाठी पैशांची मागणी

### बनावट नकाशा तयार केल्याचा आरोप : शेतकऱ्याची जिल्हा अधीक्षकांकडे तक्रार

प्रतिनिधी २७ जून

**उमरखेड** : उमरखेड तालुक्यातील भूमी अभिलेख विभागाच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी तक्रार समोर आली असून, मोजणीच्या कामासाठी पैशांची मागणी केल्याचा आणि पैसे न दिल्यामुळे बनावट मोजणी नकाशा तयार केल्याचा आरोप एका शेतकऱ्याने केला आहे.

तालुक्यातील मौजे कुपटी येथील शेतकरी विकीन जयवंतराव सूर्यवंशी यांनी जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, यवतमाळ यांच्याकडे सविस्तर लेखी तक्रार दाखल करून तत्कालीन भूमी अभिलेख अधिकाऱ्यावर गंभीर आरोप केले आहेत.

तक्रारीनुसार, न्यायालयात प्रलंबित असलेल्या जमीन प्रकरणाच्या अनुषंगाने अधिकृत मोजणी करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या तत्कालीन अधिकाऱ्याने मोजणी योग्य पद्धतीने करून देण्यासाठी दहा हजार रुपयांची मागणी केली होती. पैसे न दिल्यास जमीन ताब्यातून जाईल आणि न्यायालयीन प्रकरणात नुकसान होईल, अशी धमकी दिल्याचाही दावा तक्रारदाराने केला आहे.

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, संबंधित अधिकाऱ्याच्या सांगण्यावरून प्रदीप मदन राठोड यांच्या मोबाईल क्रमांकावर फोनपेच्या माध्यमातून तीन हजार रुपये पाठविण्यात आले. या व्यवहाराचे स्क्रीनशॉट आणि इतर पुरावे आपल्याकडे उपलब्ध असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. मात्र, उर्वरित रक्कम न दिल्यामुळे संबंधित अधिकाऱ्याने दुसऱ्या पक्षाशी संगनमत करून खोटा व बनावट मोजणी नकाशा तयार केल्याचा गंभीर आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.



मोजणी अहवालातील अनेक त्रुटींचाही तक्रारीत उल्लेख करण्यात आला आहे. शेताच्या मूळ सीमारेषा चुकीच्या दर्शविणे, पोटहिस्स्यांचा चुकीचा उल्लेख, पोटखराब क्षेत्राची अयोग्य नोंद, नैसर्गिक नाल्याचा उल्लेख टाळणे तसेच शेजारील गट क्रमांकांमध्ये विसंगती निर्माण केल्यामुळे न्यायालयाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न झाल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे.

पैशांच्या मागणीसंदर्भातील कथित मोबाईल संभाषणाचे ध्वनिमुद्रणही आपल्या ताब्यात असल्याचा दावा करत, या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच संबंधित सेवानिवृत्त अधिकाऱ्याविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यानुसार कारवाई करून चौकशी पूर्ण होईपर्यंत त्यांचे पेन्शन, भविष्य निर्वाह निधी आणि इतर निवृत्तीविषयक लाभ स्थगित करण्यात यावेत, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे.

या तक्रारीच्या प्रती मुख्यमंत्री, महसूल विभागासह भूमी अभिलेख विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही पाठविण्यात आल्याचे तक्रारदाराने म्हटले आहे. संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची भूमिका तपासून दोषी आढळल्यास कठोर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

## राष्ट्रीय नेतेपदी निवडीबद्दल मंत्री संजय राठोड यांच्या सत्कार

प्रतिनिधी २७ जून

**यवतमाळ** : शिवसेना पक्षप्रमुख तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विमुक्त, भटक्या व अर्धभटक्या जमाती (डीएनटी) समाजाच्या सक्षमीकरणासाठी राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड यांची भटक्या-विमुक्त जमातींच्या राष्ट्रीय नेतेपदी निवड केल्याबद्दल यवतमाळमध्ये पारंपरिक पद्धतीने त्यांचा जंगी सत्कार करण्यात आला.



शुक्रवारी मंत्री राठोड यांच्या निवासस्थानी विविध समाज घटकांच्या प्रतिनिधींनी एकत्र येऊन सत्कार केला. या निवडीमुळे भटक्या, विमुक्त, बंजारा आदी समाजांना राष्ट्रीय स्तरावर प्रभावी नेतृत्व मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. तसेच शिक्षण, आरोग्य, रोजगार, आरक्षण आणि मूलभूत सुविधांशी संबंधित प्रलंबित प्रश्नांना न्याय मिळेल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला.

यावेळी शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख हरीहर लिंगनवार, श्रीधर मोहोड, जिल्हाप्रमुख गजानन डोमाळे, यशवंत पवार, समन्वयक संजय हातगावकर, युवासेना जिल्हाप्रमुख प्रद्युम्न जवळकर, आदिवासी आघाडीचे सुरेश चिंचोळकर, संजय सल्लेवाड, सचिन महल्ले, निलेश बेलोकार यांच्यासह शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवसेनेकडून सांगण्यात आले की, ही नियुक्ती केवळ पदापुरती मर्यादित नसून देशातील विमुक्त, भटक्या व अर्धभटक्या समाजाला सामाजिक, आर्थिक आणि राजकीय मुख्य प्रवाहात आणण्याच्या व्यापक दृष्टीकोनाचा भाग आहे. देशात या समाजाची लोकसंख्या सुमारे १० ते १२ कोटी, तर महाराष्ट्रात सुमारे दीड कोटी असल्याचे सांगितले जाते.

बंजारा, लमाण, बेरड, रामोशी, कंजारभाट, पारधी, वडार, कैकाडी, गोसावी, बेलदार, गारुडी, गाडी लोहार, गोंधळी, कोल्हाटी, डोंबारी, नंदीवाले, वैदू, वासुदेव, बहुरुपी, शिकलगार आदी विविध समाज घटकांना एकत्रित नेतृत्वाची गरज होती.

ही जबाबदारी मंत्री संजय राठोड यांच्याकडे सोपवून उपमुख्यमंत्री शिंदे यांनी समाजाच्या अपेक्षांना बळ दिल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## महात्मा फुले विद्यालयात राजर्षी शाहू महाराज जयंती

प्रतिनिधी २७ जून

**उमरखेड** : स्थानिक महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयात राजर्षी शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शाहू महाराजांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि समतेच्या विचारांचा जागर करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रमोद देशमुख होते, तर पर्यवेक्षक किशोर राणे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली. प्रास्ताविकात पांडुरंग कानकाटे यांनी शाहू महाराजांचा जीवनपट आणि त्यांनी सामाजिक न्याय व शिक्षण क्षेत्रात केलेल्या योगदानाचा परिचय करून दिला.



मुख्याध्यापक प्रमोद देशमुख यांनी मार्गदर्शन करताना शाहू महाराजांच्या पुरोगामी विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. सामाजिक न्याय, समता आणि सर्वसमावेशक शिक्षणाच्या मूल्यांचा अंगीकार करण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन आर. डी. शिंदे यांनी केले.

कार्यक्रम शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.


## आता दिग्रस नगर परिषद झाली 'संजय'मय!

प्रतिनिधी २७ जून

संदीप रत्नपारखी

**दिग्रस** : राज्यातील बदलत्या राजकीय घडामोडींचे पडसाद दिग्रस नगर परिषदेच्या राजकारणावरही उमटण्याची शक्यता व्यक्त होत असून, नव्या राजकीय समीकरणांबाबत शहरात चर्चा रंगू लागली आहे. विशेषतः खासदार संजय देशमुख यांच्या संभाव्य राजकीय भूमिकेमुळे नगर परिषदेतील सत्तासमीकरण बदलू शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.





सध्या नगर परिषदेत मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या नेतृत्वाखालील गटाचे १६ नगरसेवक आहेत, तर खासदार संजय देशमुख यांच्या गटाकडे सात नगरसेवक आहेत. नगराध्यक्षपद खासदार गटाकडे, तर उपनगराध्यक्षपद नामदार गटाकडे असल्याने दोन्ही गटांचा प्रभाव नगर परिषदेत कायम आहे. याशिवाय एक भाजप, एक एमआयएम आणि एक अपक्ष नगरसेवक अशी सद्यस्थिती आहे. राजकीय निरीक्षकांच्या मते, विविध निर्णयांच्या वेळी या सदस्यांच्या भूमिकेमुळे नगर परिषदेत राजकीय संतुलन राखले गेले आहे.

मात्र, राज्यातील सध्याच्या राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर खासदार संजय देशमुख यांनी शिवसेनेत प्रवेश केल्यास त्यांच्यासोबत त्यांच्या गटातील नगरसेवकही येण्याची शक्यता वर्तविली जात आहे. तसे झाल्यास नगर परिषदेतील शिवसेनेची संख्या लक्षणीय वाढू शकते. नगराध्यक्ष आणि उपनगराध्यक्ष ही दोन्ही पदे एकाच पक्षाकडे राहण्याची शक्यताही व्यक्त होत आहे.

तीन स्वीकृत नगरसेवकांपैकी दोन सदस्य नामदार गटाचे, तर एक सदस्य खासदार गटाचा असल्याने तेही एकाच राजकीय छत्राखाली येऊ शकतात, अशी चर्चा आहे. परिणामी, नगर परिषदेतील बहुसंख्य सदस्य एकाच पक्षाशी संबंधित राहण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे.

या संभाव्य एकत्रीकरणामुळे शहराच्या विकासाला गती मिळेल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. एकसंध राजकीय नेतृत्व निर्माण झाल्यास विकासकामांच्या मंजुरी, निधी उपलब्धता आणि विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी पोषक वातावरण निर्माण होऊ शकते, असे मत जाणकार व्यक्त करीत आहेत.

मंत्री संजय राठोड आणि खासदार संजय देशमुख या दोन्ही नेत्यांचे राजकीय वजन एकत्र आल्यास दिग्रसला राज्य आणि केंद्र शासनाच्या विविध योजनांचा अधिक लाभ मिळू शकतो. पायाभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण आणि रोजगार निर्मितीच्या क्षेत्रांत सकारात्मक परिणाम दिसून येतील, अशी अपेक्षाही व्यक्त होत आहे.

नुकत्याच झालेल्या आमसभेवर शिवसेना नगरसेवकांनी बहिष्कार टाकल्याने आगामी काळात नगर परिषदेतील राजकीय घडामोडी कोणते वळण घेतात आणि त्याचा शहराच्या विकासावर काय परिणाम होतो, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाविरोधात एल्गार; ३० जून रोजी विधानभवनाला घेराव घालणार!

प्रतिनिधी २७ जून

**यवतमाळ** : अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरणाच्या प्रस्तावाला यवतमाळातील विविध आंबेडकरी संघटनांनी तीव्र विरोध दर्शविला असून, हा निर्णय आरक्षण व्यवस्थेला कमकुवत करण्याच्या प्रक्रियेची सुरुवात असल्याचा आरोप करण्यात आला. शासकीय विश्रामगृह येथे शुक्रवारी झालेल्या पत्रकार परिषदेत संघटनांच्या प्रतिनिधींनी ही भूमिका मांडली. ३० जून रोजी मुंबई येथे विधानभवनावर मोर्चा काढुन घेराव घालण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

यावेळी प्रा. मीनाक्षी सावळकर यांनी उपवर्गीकरणाला विरोध करताना, हा केवळ प्रशासकीय बदल नसून आरक्षणाच्या मूळ संकल्पनेवर आघात असल्याचे सांगितले. "आज जातींचे उपवर्गीकरण केले जाईल, उद्या आरक्षणाची टक्केवारी कमी होईल आणि भविष्यात आरक्षणच संपुष्टात आणण्याचा प्रयत्न होईल," असा इशारा त्यांनी दिला.

मातंग समाजाचे नेते नवनीत महाजन यांनी, "समाजाला स्वतंत्र कोटा नको असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या १५ टक्के आरक्षणाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, हीच आमची अपेक्षा आहे," असे मत व्यक्त केले.

मांग-गारुडी समाजाचे प्रतिनिधी चंदन हातागळे यांनी अनुसूचित जातीतील सर्व घटक एकत्र असल्याचा दावा करत, समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न होऊ नये, असे आवाहन केले. अनुसूचित जातीतील ५९ जाती एकत्रितपणे उपवर्गीकरणाला विरोध करतील, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली.

पत्रकार परिषदेत ॲड. जयसिंह चव्हाण, उमेश मेश्राम, आनंद भगत, रवींद्र कांबळे, ॲड. धनंजय मानकर, ॲड. प्रशांत किर्दक, नामदेव थुल, प्रा. अंकुश वाकडे, प्रमोदीनी रामटेके, हेमंत काबळे यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी ३० जून रोजी मुंबई येथे विधानभवनावर आयोजित करण्यात आलेल्या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. सरकारने उपवर्गीकरणाचा निर्णय मागे घेतला नाही, तर जिल्ह्यात साखळी उपोषण, तहसील कार्यालयांवर आंदोलन आणि जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चे काढण्यात येतील, असा इशाराही संघटनांनी दिला.

सिटी न्यूज अमरावती
शनिवार, दि. २७ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## नागरी हक्क संरक्षण पथक अमरावती ग्रामीण एक दिवसीय आयोजीत नागरीक कार्यशाळा

**अमरावती:** नागरी हक्क संरक्षण पथक अमरावती ग्रामीण व बार्टी यांच्या संयुक्त विद्यमाने अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ सुधारित नियम २०१५ कायदयांची प्रभावी अंमलबजावणी जनजागृती व गुणवत्तापूर्ण तपास या उद्देशाने एकदिवसीय नागरिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. समाजकल्याण आयुक्त कार्यालय अमरावती येथील सामाजिक न्याय भवन येथे आयोजित या कार्यशाळेला विविध क्षेत्रातील मान्यवर अधिकारी समाजकल्याण विभागाचे अधिकारी विधी तज्ज्ञ, पोलीस पाटील सामाजिक कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# 10,12 वीतील 8 हजार 300 गुणवंतांचा गुणगौरव सोहळा !

### ◆ युवा स्वाभिमान पार्टी व भाजपाचे आयोजन : आ. रवि राणा व नवनित राणा यांच्या हस्ते सन्मान

प्रतिनिधी २७ जून

**अमरावती :** जिल्ह्यातील दहावी व बारावीमध्ये गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा युवा स्वाभिमानी पार्टी व भाजपाच्यावतीने आयोजित करण्यात आला होता. आ. रवी राणा व भाजपा नेत्या नवनीत राणा यांच्या हस्ते ८ हजार ३०० गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कारासोबतच अमरावती जिल्ह्यात विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी अमरावतीला शैक्षणिक व औद्योगिक केंद्र बनविण्याचा आ.रवि राणा व मा.खा.नवनित राणा यांचा संकल्प केला. आजचा हा गुणगौरव सोहळा केवळ विद्यार्थ्यांचा सन्मान नाही, तर त्यांच्या कष्टांचा, पालकांच्या त्यागाचा आणि शिक्षकांच्या परिश्रमांचा गौरव आहे. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आम्ही नेहमीच त्यांच्या पाठीशी राहील, अशी ग्वाही यावेळी आ.रवि राणा यांनी दिली. सत्काराच्या वेळी विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक बॅग, नोटबुक, पेन, वॉटर बॉटल, टिफीन बॉक्स इ. साहित्यासोबतच विद्यार्थ्यांच्या यशामागे मोलाचे योगदान असणाऱ्या आईचा सन्मान म्हणून आईकरिता साडी अशी आ.रवि राणा व माजी खा.नवनित राणा यांनी भावनिक भेट दिली. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्याला महानगरपालिकेचे महापौर श्रीचंद तेजवानी, भाजपा जिल्हा शहराध्यक्ष नितीन धांडे, उपमहापौर सचिन भेंडे, हरमन फिनोकेम कंपनीचे संचालक हरप्रीत मिनहास, युवा



स्वाभिमान पार्टीचे जिल्हाध्यक्ष प्रकाश साबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. यावेळी भाजपा नेत्या माजी खा. नवनित राणा यांनी सांगितले की, 'अमरावतीतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणानंतर रोजगारासाठी बाहेर जावे लागू नये, यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष सहकार्याने अमरावती येथे अत्याधुनिक आयटी पार्कची निर्मिती करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला रोजगाराच्या संधी जोडण्याचा आमचा प्रयत्न आहे. अमरावतीला शैक्षणिक व औद्योगिक केंद्र बनविण्याचा आमचा संकल्प आहे. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान आणि त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी सातत्याने कार्य करण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी व पालकांनी राणा दाम्पत्याचे आभार व्यक्त करत, विद्यार्थ्यांना दिलेला सन्मान आणि मातांचा केलेला गौरव हा अविस्मरणीय असल्याच्या भावना व्यक्त केल्या.

या गुणगौरव सोहळ्यामध्ये इतर क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या गुणवंताचा सत्कार सुद्धा करण्यात आला. या कार्यक्रमाचे संचालन प्रतिक्षा डांगे यांनी केले. यावेळी निळकंठराव कात्रे, सुनिल राणा, जयंतराव वानखडे, शैलेंद्र कस्तुरे, कमल किशोर मालानी, अॅड. नंदेशजी अंबाडकर, प्रा.अजयजी गाडे, गंगाधर आवारे, समाधान वानखडे, सुखदेव तरडेजा, विनोद जायलवाल, संजय मुनोत यांच्यासह असंख्य विद्यार्थी, पालकवर्ग तसेच युवा स्वाभिमान पार्टी व भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## कारंजा बहीरम येथे गोवंश तस्करांवर धडक कारवाई

### १२ लाख ७७ हजारांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी २७ जून

**परतवाडा :** कारंजा बहीरम येथे गोवंश तस्करांवर धडक कारवाई करून १२,७७,०००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस अधिक्षक निकेतन कदम यांनी पोलीस स्टेशन हद्दीत वरली, जुगार, अवैध दारु विक्री, गावठी हातभट्टी, अवैध रेती वाहतुक व गोवंश वाहतुक यांचेविरुद्ध कठोर कार्यवाही करणेबाबत सर्व ठाणेदार यांना आदेशित केले आहे.

त्यानुसार २६ जून रोजी पोलीस ठाणे शिरजगाव येथील अधिकारी व अंमलदार यांना मिळालेल्या गोपनिय माहितीवरुन



सकाळी ९.०० वाजेच्या सुमारास ग्राम कारंजा बहीरम येथुन मालुर कडे जाणाऱ्या कच्च्या रोडने पंचांसमक्ष जाऊन कारवाई केली असता, एक आयशर कंपनीचा ट्रक मिळुन आला. त्याची पाहणी केली असता त्यात गोवंश जातीची जनावरे निर्दयतेने दोरीने बांधुन डांबुन घेऊन जात असतांना दिसले. सदर ट्रकमधील गोवंश जनावरे पंचांसमक्ष ट्रकमधुन बाहेर काढले असता ट्रक मधे एकुण १९ जनावरे मिळुन आली. त्यापैकी ०५ गोवंश जनावरे मृत अवस्थेत मिळुन आली. या प्रकरणी ४ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

## जिल्हा सामान्य रुग्णालयात नवजात बालकांसाठी स्वतंत्र आयसीयू युनिट उभारणार का - आ.सुलभा खोडके

### ◆पावसाळी अधिवेशनात वेधले लक्ष ◆विशेष बाब म्हणून आरोग्याच्या सेवा उपलब्ध करून देऊ

प्रतिनिधी २७ जून

**अमरावती :** विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये विधानसभेतील कामकाजा दरम्यान आमदार सौ.सुलभाताई संजय खोडके यांनी अमरावती जिल्हयाच्या आरोग्य सेवांचा विस्तार व अधिक बळकटी मिळण्यासंदर्भात तारांकित प्रश्न उपस्थित केला. गंभीर अवस्थेतील बालकांना वेळेत उपचार मिळावेत म्हणून जिल्हा सामान्य रुग्णालय (इर्विन ) येथे नवजात बालकांना अतितात्काळ आरोग्य सेवा




पुरविण्यासाठी स्वतंत्र आयसीयु युनिट स्थापन करण्याची मागणी आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी विधानसभेतुन केली आहे.

आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी सभागृहाला अवगत केले कि, अमरावती येथे जिल्हा सामान्य रुग्णालय व जिल्हा स्त्री रुग्णालय येथे आरोग्याच्या चांगल्या सुविधा निर्माण होत आहे. जिल्हा स्त्री रुग्णालय (डफरीन ) येथे नूतन इमारतीमध्ये नवजात बालकांसाठी ४६ बेडेड एनआयसीयु केअर युनिट सुरु आहे. त्याठिकाणी शहरी भागाबरोबरच ग्रामीण तसेच मेळघाट -धारणी सारख्या आदिवासी दुर्गम भागातून रुग्ण मोठ्या प्रमाणात दाखल होत असतात. त्यामुळे आजारी किंवा मुदतपूर्व जन्माला आलेल्या नवजात बाळांची काळजी घेण्यासाठी २४ तास आयसीयू ची वैद्यकीय सेवा पुरवितांना अडचणी निर्माण होतात. सद्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अमरावती करिता जिल्हा सामान्य रुग्णालयाची इमारत हस्तांतरित करण्यात आली आहे. त्यामुळे जिल्हा सामान्य रुग्णालयात नवजात बाळांसाठी स्वतंत्र आयसीयू युनिट निर्माण करणे आवश्यक असल्याचे सुद्धा आमदार महोदयांनी सभागृहात समक्ष सांगितले. यासंदर्भात सभागृहा समक्ष उत्तर देतांना राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री नामदार - प्रकाश आबिटकर यांनी सांगितले कि, अमरावती जिल्हयाच्या आरोग्याचे प्रश्न सोडविण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्नरत असून नेहमीच चांगल्या आरोग्याच्या सुविधा निर्माण करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. जिल्ह्यातील आदीवासी क्षेत्रात देण्यात येणाऱ्या सर्व आरोग्य सुविधांच्या अनुषंगाने विशेष बाब म्हणून नवजात बालकांसाठी सुद्धा अतिदक्षतेच्या सेवा तात्काळ उपलब्ध करण्यासाठी शासन सकारात्मक असल्याचे ना. आबिटकर यांनी सभागृहात सांगितले.

## शांतता समिती व कायदेविषयक मार्गदर्शन सभा संपन्न!




प्रतिनिधी २७ जून

**अमरावती:** गाडगेनगर पोलीस स्टेशनच्या वतीने जातीय सलोखा व सामाजिक धार्मिक ऐक्य अबाधित ठेवण्याच्या दृष्टीने शांतता समिती ची सभा दिनांक २४ जून रोजी संपन्न झाली.

या सभेतकायदेविषयक मार्गदर्शन ही करण्यात आले. विविध सामाजिक संघटना, ज्येष्ठ नागरिक मंडळे आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत ही सभा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. सभेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून ज्येष्ठ साहित्यिक व सामाजिक कार्यकर्ते डॉ. सतीश तराळ यांनी मार्गदर्शन केले. आपल्या भाषणात त्यांनी भारतासारख्या बहुसंस्कृतिक देशात जाती व धार्मिक सलोखा आवश्यक आहे सर्व धर्मीयांचे सण सर्व धर्मीयांनी मिळून साजरे करावे असे आवाहन केले. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या ईद मिलन, रक्तदान शिबिरे तसेच विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. यासोबतच ज्येष्ठ नागरिकांचे हक्क सुरक्षित करण्यासाठी ज्येष्ठ नागरिक कायदा आणि समाजातील अंधश्रद्धा, फसवणूक व बुवाबाजी रोखण्यासाठी जादूटोणा विरोधी कायदा प्रभावीपणे राबविण्याची गरज अधोरेखित केली. या विषयांवर सातत्याने काम करण्यासाठी सर्व सामाजिक संघटना व ज्येष्ठ नागरिक मंडळांनी दरमहा संयुक्त बैठक आयोजित करावी, अशी सूचना त्यांनी केली. यावेळी मा. गोरखनाथ जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गाडगेनगर पोलीस स्टेशन तसेच मा. सुनील चव्हाण, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्पेशल ब्रँच यांनी कायद्याचे पालन, सामाजिक सलोखा आणि नागरिकांच्या सहभागाचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले.

## अमरावती रेल्वे उड्डाणपुल पुनर्निर्मितीच्या कामास गती द्या - आ. संजय खोडके

### ◆ महारेल यंत्रणेकडे अमरावती आरओबीचे काम हस्तांतरित केल्यास काम रखडण्याची शक्यता

प्रतिनिधी २७ जून

**अमरावती :** मागील वर्षभरापासून सर्वच प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद करण्यात आलेल्या अमरावती रेल्वे उड्डाणपुलाच्या पुनर्बांधणीच्या कामासाठी गेल्या मार्च २०२६ च्या अर्थसंकल्पात १२५.३७ कोटींचा निधी मंजूर झाला आहे. त्यासंदर्भातील प्रशाकीय मान्यता , डिझाईन व सर्व तांत्रिक प्रक्रिया पूर्ण झाल्याने आता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अमरावती आरओबी पुनर्बांधणीच्या कामास सुरुवात झाली आहे. अशा परिस्थितीत महारेल यंत्रणेकडे अमरावती आरओबीचे काम हस्तांतरित केल्यास सर्व तांत्रिक मान्यतांच्या प्रक्रिया नव्याने कराव्या लागतील. म्हणून अमरावती आरओबी पुनर्बांधणीच्या कामासाठी नव्याने कोणतीही एजन्सी न नेमता सदरचे कामाकरिता सार्वजनिक बांधकाम



विभाग यंत्रणेला कायम ठेवून कामास गती देण्याची मागणी आ.संजय खोडके यांनी विधानपरिषदेतून केली आहे.


आमदार संजय खोडके यांनी सभागृहाला अवगत केले कि, अमरावती ते बडनेरा या रेल्वे लाईनवर सन १९६३ च्या सुमारास रेल्वे उड्डाणपुलाची निर्मिती करण्यात आली. या उड्डाणपुलावरून शहराच्या चार भागाची वाहतूक जोडली गेली असून अमरावती शहरातील राजकमल चौक, हमालपुरा, रेल्वे स्थानक आणि जयस्तंभ चौकासारख्या महत्त्वाच्या केंद्रांना हा रेल्वे पूल जोडला असल्याने शहरवासीयांना वाहतूक व रहदारीची चांगली सुविधा होत होती. दरम्यान या पुलाचे स्ट्रक्चर ऑडिट मध्ये हा पूल वाहतुकीसाठी धोकादायक असल्याचे सांगण्यात आल्याने गेल्या ऑगस्ट २०२५ पासून या पुलावरून सर्वच प्रकारची वाहतूक बंद करण्यात आली. त्यामुळे शहरात वाहतुकीची प्रचंड कोंडी निर्माण होऊन नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

अमरावतीकरांची रहदारीची समस्या दूर करण्यासाठी आणि सार्वजनिक वाहतूक सुलभ करण्यासाठी शासनाने रेल्वे उड्डाणपुल निर्मिती प्रकल्पासाठी तात्काळ निधी देऊन विहित मुदतीत व गुणवत्तापूर्वक पद्धतीने उड्डाणपुलाचे पुनर्बांधणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे जुन्या अस्तित्वातील रेल्वे उड्डाण पूलाच्या जागी नवीन रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकामासाठी १२५.३७ कोटींचा निधी लागणार असल्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला.

## पी. आर. पोटे पाटील आयुर्वेद महाविद्यालयाचा उत्कृष्ट निकाल

### ◆ बीएएमएस विद्यापीठ परीक्षेच्या निकालात विदर्भात प्रथम

प्रतिनिधी २७ जून



**अमरावती :** अवघ्या चार वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या आणि अल्पावधीतच रुग्ण व विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय ठरलेल्या पी. आर. पोटे पाटील आयुर्वेद महाविद्यालयाने प्रथम वर्ष बीएएमएसच्या च्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापिठ नाशिक द्वारे घेण्यात आलेल्या परीक्षेच्या निकालात विदर्भात अव्वल स्थान पटकावले आहे.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातर्फे २०२४-२५ या शैक्षणिक सत्रात प्रथम वर्षाला प्रवेशित विद्यार्थ्यांची हिवाळी परीक्षा मार्च-एप्रिल २०२६ मध्ये घेण्यात आली होती. या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून महाविद्यालयाचा निकाल ९५.१६ टक्के लागला आहे.

विदर्भात एकूण २८ आयुर्वेद महाविद्यालये असून त्यामध्ये १ शासकीय, ५ अनुदानित आणि उर्वरित खासगी महाविद्यालयांचा समावेश आहे. या सर्व महाविद्यालयांमध्ये पी. आर. पोटे पाटील आयुर्वेद महाविद्यालयाने प्रथम क्रमांक मिळवला आहे. तसेच राज्यातील १२५ आयुर्वेद महाविद्यालयांमध्ये हे महाविद्यालय चौथ्या क्रमांकावर राहिले आहे.

महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये सानिका अनिल महाजन हिने ७३.६४ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला. प्रेरणा महेंद्र रामटेके (७२.७० टक्के) हिने द्वितीय, तर गौरी कैलास बोरे (७२.१७ टक्के) हिने तृतीय क्रमांक पटकाविला.

महाविद्यालयातील गुणवत्तापूर्ण शिक्षण, अनुभवी प्राध्यापकवर्ग तसेच रुग्णालयातील प्रभावी आरोग्यसेवा यांमुळे राज्यासह राज्याबाहेरील विद्यार्थीही या महाविद्यालयाला पसंती देत आहेत.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक डॉ. पी. एम. खोडके, प्राचार्य डॉ. रणजित देशमुख तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# अमरावतीत पल्स पोलिओ मोहिमेची तयारी : २८ जून रोजी ६७ हजारांहून अधिक बालकांना पोलिओचे दोन थेंब

### ◆ प्रत्येक बालकापर्यंत पोलिओचे दोन थेंब पोहोचवा; आयुक्त वर्षा लड्डा यांचे पालकांना आवाहन

प्रतिनिधी २७ जून

**अमरावती:** देशातून पोलिओचे संपूर्ण उच्चाटन कायम राखण्यासाठी आणि प्रत्येक बालकाला पोलिओपासून संरक्षण मिळावे या उद्देशाने २८ जून रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेच्या पार्श्वभूमीवर अमरावती महानगरपालिकेत महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीत मोहिमेच्या नियोजनाचा सखोल आढावा घेण्यात आला असून शहरातील एकही पात्र बालक लसीकरणापासून वंचित राहणार नाही, यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन करण्यात आले.

बैठकीस महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे, एन.एम.ए. अध्यक्ष डॉ. दिनेश वाघाडे, बालरोगतज्ज्ञ संघटनेच्या अध्यक्षा डॉ. प्रतिभा काळे यांच्यासह आरोग्य विभागाचे अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, विविध शहरी आरोग्य केंद्र उपस्थित होते.

बैठकीत आगामी मोहिमेच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. लसीकरण केंद्रांची तयारी, बूथवरील मनुष्यबळ, मोबाईल व ट्रान्झिट पथकांची कार्यपद्धती, दुर्गम व स्थलांतरित कुटुंबांपर्यंत पोहोचण्याचे नियोजन, जनजागृती उपक्रम तसेच लसीकरणानंतरच्या अहवाल व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला. शहरातील प्रत्येक ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकापर्यंत पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पोहोचावेत, यासाठी सूक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

यंदाच्या मोहिमेत अमरावती शहरातील ० ते ५ वर्षे वयोगटातील एकूण ६७,१०७ बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचा डोस देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शहरभर ३३७




लसीकरण बूथ, १९ मोबाईल पथके आणि २९ ट्रान्झिट पथके कार्यरत राहणार आहेत. बसस्थानके, रेल्वे स्थानक, प्रमुख चौक, स्थलांतरित वस्त्या आणि प्रवाशांची वर्दळ असलेल्या ठिकाणी ट्रान्झिट पथकांद्वारे बालकांना लसीकरणाची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

यावेळी महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, 'पोलिओमुक्त भारताचे यश कायम राखण्यासाठी प्रत्येक पालकाने आपल्या पाच वर्षांखालील प्रत्येक बालकाला २८ जून रोजी जवळच्या पल्स पोलिओ लसीकरण केंद्रावर घेऊन जावे आणि पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब अवश्य पाजावेत. नियमित लसीकरण झाले असले तरी पल्स पोलिओचा डोस घेणे तितकेच आवश्यक आहे. शहरातील एकही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी नागरिकांनी प्रशासनाला पूर्ण सहकार्य करावे.'

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांनी मोहिमेच्या अंमलबजावणीसाठी आरोग्य विभागाने केलेल्या तयारीची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, लसीकरणासाठी आवश्यक मनुष्यबळ, औषधसाठा, वाहतूक व्यवस्था आणि देखरेख यंत्रणा सज्ज असून, सर्व पथकांना आवश्यक प्रशिक्षण देण्यात आले आहे. प्रत्येक भागातील बालकांची अचूक नोंद ठेवून शंभर टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत.

आय.एम.ए. अध्यक्ष डॉ. दिनेश वाघाडे आणि बालरोगतज्ज्ञ संघटनेच्या अध्यक्षा डॉ. प्रतिभा काळे यांनीही पालकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा आणि आपल्या परिसरातील प्रत्येक बालकाला पोलिओचे दोन थेंब मिळतील यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन केले.

बैठकीत विविध विषयांवर सकारात्मक चर्चा झाली असून मोहिमेच्या तयारीबाबत समाधान व्यक्त करण्यात आले. आरोग्य विभाग, महानगरपालिका प्रशासन, वैद्यकीय अधिकारी, स्वयंसेवक आणि विविध सामाजिक संस्थांच्या समन्वयातून ही मोहीम शंभर टक्के यशस्वी करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

या बैठकीस वैद्यकीय अधिकारी डॉ. स्वाती कोवे, डॉ. संदीप पाटबागे तसेच शहरातील १३ शहरी आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी आणि आरोग्य विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. २८ जून रोजी होणाऱ्या या मोहिमेत पालकांनी आपल्या पाच वर्षांखालील प्रत्येक बालकाला जवळच्या पोलिओ लसीकरण केंद्रावर नेऊन पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजावेत, असे आवाहन महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांनी केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
शनिवार दि २७ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com




गुरुवार दि १८ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

लोकशाहीची हत्या
खासदारांची बोली किती? 50 की 85 खोके?
सत्ताधाऱ्यांनो फोडाफोडी बंद करा

मतांचा बाजार, खासदारांचा व्यापार, सत्ताधाऱ्यांचा 'लोकशाही' वर प्रहार !

*विकले जाणारे आणि विकत घेणारे दोघेही गद्दार *विचारात पडले मतदार

अतिश देशमुख @ वाशीम

# उद्धव ठाकरे साहेब...
# कार्यकर्त्यांचा होतोय छळ, शिवसैनिकांना द्या बळ !



## बदला नीती, वाढवा गती, सच्चा शिवसैनिकाची होते माती...

**अतिष देशमुख @ वाशीम**

राजकारण बदलत आहे. सच्चा कार्यकर्त्याचा 'यूज अँड थ्रो' चा वापर होत आहे. 'लोकशाही'ला काळिमा फसणाऱ्या घटना घडत आहेत. उद्धव ठाकरे साहेब आपल्या शिवसेनेचे अगोदर आमदार आता ६ खासदार एकनाथ शिंदे च्या शिवसेनेत दाखल झाले. सच्चा शिवसैनिकांनी अहोरात्र मेहनत घेऊन त्यांना निवडून दिले त्यांचा विश्वासघात झाला. मात्र शिवसेनेला इतिहास आहे. हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी रस्त्यावरच्या शिवसैनिकाला मुख्यमंत्री केले. ज्यांना शिवसेनेने मोठे नेते केले, मात्र आता खोटे ठरत आहेत. त्यामुळे आता राजकारणाची नीती बदलून गती वाढवण्यासाठी शिवसेनेला पाठबळ देण्याची गरज आहे.

फुटलेल्या आमदार, खासदारांसाठी सोशल मीडियावर गद्दार, विकाऊ, फुटीर या शब्दांनी भरभराट झाली. पण हा फक्त पुढचा, दिसणारा भाग आहे. हे प्रकरण केवळ आमदार खासदारांक्या फुटण्याची नाही, हे लोकशाहीचा गळा घोटण्याचे सामान्य कार्यकर्त्याला संपविण्याची व्यवस्थित, थंड डोक्याने रचलेले षड्यंत्र आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे साहेब चांगले वाईट ओळखा, सच्चा शिवसैनिकांना बळ द्या, राजकारणाचा चेहरामोहरा बदलत असताना आज सच्च्या कार्यकर्त्याच्या संघर्षाकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना अनेक शिवसैनिकांमध्ये निर्माण झाली आहे. अहोरात्र मेहनत घेऊन, पक्षासाठी रक्ताचे पाणी करणाऱ्या कार्यकर्त्यांना मात्र अनेकदा उपेक्षेचा सामना करावा लागत आहे.

आतिशबाजी

शिवसेनेचा इतिहास संघर्षाचा आहे. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी सामान्य शिवसैनिकाला मोठे स्थान दिले, रस्त्यावरच्या कार्यकर्त्याला नेतृत्वाची संधी दिली. मात्र आज निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या मनात अस्वस्थता निर्माण होत आहे.उद्धव ठाकरे साहेब, पक्षासाठी प्रामाणिकपणे उभा राहणाऱ्या शिवसैनिकाला आधार, विश्वास आणि बळ देण्याची गरज आहे. कारण पक्षाची खरी ताकद पदावर असणाऱ्या नेत्यांमध्ये नाही, तर तळागाळात झटणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्यांमध्ये असते. आज गरज आहे ती राजकारणाची नीती बदलण्याची, संघटनाला नवी गती देण्याची आणि सच्च्या शिवसैनिकांना योग्य न्याय देण्याची. शिवसैनिक टिकला, तरच शिवसेना मजबूत राहील.

---

## थोडक्यात

### मंगरूळपीर नगर परिषदेत 'एकल महिला दिन' साजरा



**सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर**

मंगरूळपीर नगर परिषदेमार्फत 'एकल महिला दिन' विविध जनजागृती उपक्रमांसह उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कार्यालय अधीक्षक शेखर चव्हाणडल उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून इंजी. अमोल भगत यांनी एकल महिलांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक सक्षममीकरणासाठी शासन राबवत असलेल्या महिला व बालकल्याण विभागाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमास समुदाय संघटक कुलदीप इंजलकर व सीआरपी सोनाली पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन सोनाली पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन कुलदीप इंजलकर यांनी मानले.हा कार्यक्रम मा. मुख्याधिकारी श्री अरविंद मुंडे, नगराध्यक्ष श्री अशोक परळीकर, उपनगराध्यक्ष श्री अनिल गावंडे तसेच महिला व बालकल्याण समितीच्या सभापती सौ. लता चितलांगे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला.कार्यक्रमास शहरातील एकल महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासनाच्या विविध योजनांबाबत माहिती घेतली. यावेळी महिलांच्या हक्क, सन्मान, स्वावलंबन आणि सामाजिक सहभाग याविषयी जनजागृती करण्यात आली.

### राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या विचारांचा जागर

**वाशीम :** सामाजिक न्यायाचे अग्रदूत आणि लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त वाशिम येथे सामाजिक न्याय दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, सहायक संचालक इतर मागास बहुजन कल्याण, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती तसेच जिल्हा समाज कल्याण अधिकारी (जिल्हा परिषद) यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून काढण्यात आलेल्या समता दिंडीने झाली. समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त पीयूष चव्हाण यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून दिंडीला हिरवी झेंडी दाखवली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, शहरी पोलीस स्टेशन आणि बसस्थानक मार्गे निघालेली ही दिंडी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे पोहोचली.

---

# वाशीम येथील फुले मार्केट नव्हे 'फेल मार्केट'!

**सिटी न्युज ब्युरो @ वाशीम**



जिकडे तिकडे चोहीकडे घाणच घाण

नगरपरिषदेच्या वतीने शहरातील मोक्याच्या जागी बीओटी तत्वावर बांधण्यात आलेल्या महात्मा फुले संकुलाची आजघडीला दुरावस्था झाली असून या संकुलाची स्वच्छता व देखरेखीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या विकासकाचे याकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे येथील दुकानदारांच्या व्यवसायावर वाईट परिणाम होत आहे.

येथील दुकानदारांकडून कर व भाडे न.प.ला भरणापोटी काही रक्कम या संकुलाच्या देखरेखीसाठी नियुक्त केलेल्या विकासकाला मिळत असते हे येथे उल्लेखनिय. माहितीच्या अधिकारान्वये या संकुलाबाबतच्या महत्वपुर्ण कागदपत्रांची मागणी केली असता ही कागदपत्रे अमरावती येथील विभागीय कार्यालयात जमा असल्याचे सांगण्यात आले.याबाबत अधिक वृत्त असे की, लघु व्यवसायीकांच्या व्यवसायासाठी येथील रविवार बाजारात नगर परिषदेच्या वतीने महात्मा फुले संकुल उभारण्यात आले आहे. व्यापारीक दृष्टीकोनातून उभारण्यात आलेले हे संकुल न.प.पदाधिकारी व अधिकाऱ्यांच्या ठिसूळ नियोजनामुळे पुर्णत: 'फेल मार्केट' म्हणून कुप्रसिध्द झाले आहे. सगळीकडे घाण, दुर्गंधी, अस्वच्छता या चक्रात सापडलेल्या या संकुलाचा वापर आजघडीला गदुल्ले, नशेबाज, पत्तेबाज, अवैध दारुविक्री, अवैध वरली मटक्यासाठी उपयोगात येत आहे. त्यामुळे या डोकेदुखीला संकुलातील लघुव्यवसायीकांना सामोरे जावे लागत आहे.

संकुलात भाजीपाला विक्रेत्यांसाठी नगर परिषदेने गाळे तयार केले आहेत. मात्र भाजीपाला विक्रेते या गाळयात बसण्याऐवजी खुल्या जागेतच भाजीपाला विक्री करत आहेत. त्यामुळे मोकळ्या असलेल्या या जागेचा वापर रात्रीच्या वेळेस हागणदारीसाठी व दिवसा मुत्रीघर म्हणून होत आहे. संकुलात कामासाठी येणारे नागरीक दुर्गंधीमुळे नाकाला रुमाल लावूनच येतात. येथील वातावरणामुळे महिला वर्ग तर येथे येण्यासही धजावत नाहीत.

वाशीम मतदार संघाला लखन मलीक यांच्या रुपाने भारदस्त व निस्वार्थी आमदार मिळाले आहेत. येथील लघु व्यवसायीक व्यापाऱ्यांनी संकुलातील परिस्थीतीबाबत सुधारणा होण्यासाठी आमदारांना सुध्दा निवेदने दिली आहेत. मात्र त्यांच्या आमदारकीचाही प्रभावही संकुलाची सुधारणा होण्यासाठी कुचकामी ठरत आहे. त्यामुळे नगर परिषदेसोबतच लोकप्रतिनिधी बाबतही येथील लघु व्यवसायीकांच्या आशा धुळीस मिळाल्या आहेत.

---

# उकळी पेन-शिरपूटी रस्ता काम अपूर्ण, केव्हा होणार पूर्ण !

**ठेकेदार गायब तर.. संबंधित शेतकऱ्याने पुलाला लावल्या काट्या...**



**सिटी न्युज ब्युरो @ उकळीपेन**

मागील २ वर्षांपासून उकळी पेन - शिरपूटी रस्ता प्रलंबित आहे. शेतकरी, प्रशासन किंवा ठेकेदार यांच्या अंतर्गत वादात मात्र... नाला पार करुन जाणारे शेतकरी आणी शिरपूटी येथून हॉस्पिटल, बाजार, बँक काम, पोलीस चौकी, पोस्ट ऑफिस, शालेय विद्यार्थी यांना मात्र नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

आता पाऊसाला सुरुवात झाल्यानंतर लगेच पेरणी ला सुरुवात होईल तर शेतकऱ्यांचे आतोनात हाल होणार आहेत.. कारण रस्ता बंद आहे.. ब्रिज ही शेतकऱ्यांने बंद केला आहे. तेंव्हा ट्रॅक्टर नेणे असो की मोटर सायकल ने ये जा असो प्रचंड त्रास सोसावा लागणार आहे. उन्हाळ्यात सुद्धा नाल्यातुन मोटर सायकल प्रवास करतांना अनेकदा छोटे छोटे अपघात झालेले आहेत. तेंव्हा संबंधित शासकीय, प्रशासकीय अधिकारी यांनी त्वरित प्रलंबित प्रश्न मार्गी लावून रस्ता इस्टीमेट प्रमाणे पूर्णत्वास नेऊन शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशी मागणी उकळी पेन आणी शिरपूटी वासियांकडून होत आहे.

---

# कर्तव्याचा ध्यास, कायद्याचा श्वास; शिरपूरच्या ठाणेदारपदी योगिता भारद्वाज !

**प्रभाकर नाईकवाडे @ केनवड**



शिरपूर पोलीस स्टेशनच्या नवनियुक्त ठाणेदार योगिता भारद्वाज यांनी नुकताच आपल्या पदाचा अधिकृत पदभार स्वीकारला. तत्कालीन ठाणेदार वाघ यांची उपविभागीय पोलीस अधिकारी (डीवायएसपी) म्हणून वाशीम येथे पदोन्नती झाल्याने हे पद रिक्त झाले होते. त्या रिक्त पदावर योगिता भारद्वाज यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे, शिरपूर पोलीस स्टेशनच्या इतिहासात पहिल्या महिला ठाणेदार म्हणून त्यांची नोंद झाली आहे. हा बहुमान निश्चितच उल्लेखनीय असला, तरी आता त्यांच्या नेतृत्वाखाली परिसरातील अवैध धंदे, वाढती गुन्हेगारी आणि कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नांवर कितपत प्रभावी आळा बसतो, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. 'लेडी सिंघम' म्हणून त्यांची ओळख प्रत्यक्ष कामगिरीतून सिद्ध होते का, हे येणारा काळच ठरवेल. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी पोलीस स्टेशनच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेत अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. कायदा व सुव्यवस्था अधिक प्रभावीपणे राखणे, नागरिकांच्या तक्रारींवर तातडीने प्रतिसाद देणे, महिलांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देणे तसेच लोकाभिमुख, पारदर्शक आणि विश्वासार्ह पोलीस प्रशासन देण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी विविध सामाजिक संस्था, नागरिक, व्यापारी, लोकप्रतिनिधी व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले आणि पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या नियुक्तीमुळे शिरपूर परिसरातील पोलीस प्रशासन अधिक सक्षम, संवेदनशील व जनतेशी सुसंवादी होईल, अशी अपेक्षा उपस्थितांनी व्यक्त केली.

---

# शहरातील समस्या सोडवा, शहराची हद्द वाढवा !

## विविध कॉलनीतील समस्यांचे मुख्याधिकारी यांना निवेदन

**सिटी न्युज ब्युरो @ कारंजा**



कारंजा शहरातील कोहिनूर कॉलणी, राजपॅलेस, साहारा, पारेख व राज नगर या हद्दवाढ भागातील सर्व कॉलण्यांमध्ये तात्काळ नळ योजना मंजूर करून ती कार्यान्वित करावी, तसेच विविध समस्या बाबत नागरिकांनी नगरपरिषद मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

परिसरातील नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून पाण्यासाठी मोठ्या प्रमाणात हालअपेष्टा सहन कराव्या लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.तसेच परिसरात सिमेंट रस्ते, नाल्या व स्ट्रीट लाईटची अत्यंत दयनीय अवस्था असल्याने नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.त्यामुळे प्रशासनाने तात्काळ सिमेंट रस्ते व नाल्यांचे काँक्रिटीकरण करावे.काही भागांमध्ये स्ट्रीट लाईट नसल्याने रात्रीच्या वेळी अंधाराचे साम्राज्य निर्माण होत असून नागरिकांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला आहे.त्यामुळे आवश्यक त्या ठिकाणी नवीन इलेक्ट्रिक पोल बसवून स्ट्रीट लाईटची सुविधा उपलब्ध करून द्यावी, आवश्यक उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात, नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित या समस्या तातडीने सोडवून विकासकामांना मंजुरी देऊन प्रत्यक्ष कामास सुरुवात करावी, यावेळी कॉलणीच्या वतिने राजीव भेंडे यांनी मुख्याधिकारी यांच्याशी विविध समस्येवर विस्तृत चर्चा केली यावेळी नगरपरिषद मुख्याधिकारी यांनी सुध्दा सकरात्मक चर्चा करून तातडीने समस्या निवारण्याचे सम्बन्धित अधिकाऱ्यांना निर्देश दिले व लवकरच मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.

यावेळी प्रामुख्याने राजीव पाटील भेंडे, विजय पाटिल राऊत, सुभाषभाऊ चौधरी, सतीशभाऊ ठाकरे, नरेंद्रभाऊ ठाकरे, रमेश सर नगरे, गजानन नेमाने हर्षल काटोले, मनोज सर भटकर, माहुलकर साहेब, रामेश्वर भोंडणे, अर्जूनयेरवाल, नानाभाऊ वरघट, पवन चौधरी, अमोल जुमळे अशोक चौधरी, राजू मेथडे, समाधान गुडदे, रुपेश राठोड, शंतनु कदम, संतोष डुकरे, सिध्देश्वर नवघरे, दामोदर पांडे, संजय निळे, सुरेश वानखडे, नितीन कंचनपुरे रमेश वरघट, गोपाल पांडे, सचिन इंगोले, सौ.संगिता नागोलकर, अनिल हजारे मेजर चव्हाण, प्रकाश अंभोरे, भारत राठोड, चंद्रकांत ऊके, प्रल्हाद पुंड, समर्थ काळे सतिश गिरमकार, रूपेश जाधव, सिताराम जाधव, विजय गायकवाड, गजानन जाधव, थेर, सचिन गावंडे, नितीन लोखंडे, बारबोले, नवरे हे उपस्थित होते.

---

# घोटे डॉक्टरांचा प्रताप भारी, परवाना आहे म्हणे घरी !

**प्रभाकर नाईकवाडे @ केनवड**




रिसोड तालुक्यातील केनवड येथील घोटे डॉक्टर यांच्या खासगी दवाखान्याबाबत जैविक वैद्यकीय कचऱ्याच्या विल्हेवाटीवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, दवाखान्यातील वापरलेल्या सलाईनच्या बाटल्या, इंजेक्शनच्या सुया, सिरिंज, काचेच्या औषधांच्या शिश्या व इतर जैविक कचरा दवाखान्यासमोरच जाळला जात असून, त्यातील सुया आणि काचेचे तुकडे उघड्यावरच पडून राहत आहेत.

संबंधित डॉक्टरांकडे जैविक वैद्यकीय कचऱ्याच्या विल्हेवाटीचा अधिकृत परवाना असल्याचे सांगितले जात असल्याची चर्चा आहे. मात्र, जर सर्व कचऱ्याची नियमानुसार विल्हेवाट लावली जात असेल, तर दवाखान्यासमोर दिसणारा हा जैविक कचरा नेमका कोणाचा आणि तो तेथे कसा आला, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. हा प्रकार राष्ट्रीय महामार्गालगत, अकोला जिल्हा मध्यवर्ती बँकेसमोर आणि मुख्य रस्त्याच्या कडेला असल्याचा आरोप करण्यात आला आहे. परिसरात एसबीआय, सेतू केंद्र, ग्रामीण उपकेंद्र, एसटी बसथांबा तसेच गुरुवारी साप्ताहिक बाजार भरत असल्याने येथे दररोज मोठ्या प्रमाणात नागरिकांची वर्दळ असते. अशा ठिकाणी घातक वैद्यकीय कचरा उघड्यावर असल्याने नागरिकांच्या आरोग्याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे सिटी न्यूज सुपरफास्टने यापूर्वीही हा प्रकार वृत्तातून समोर आणला होता. मात्र, त्यानंतरही परिस्थितीत बदल झालेला नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. आजही घटनास्थळी काचेच्या शिश्या, इंजेक्शनच्या सुया आणि इतर वैद्यकीय कचरा दिसत असल्याचे सांगितले जात आहे.


शुक्रवार दि २६ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
केनवडात नागरिकांच्या जीवाशी खेळ...
दवाखान्यासमोरच जैविक कचरा जाळण्याचा मेळ!
आजही प्रकार चालुचं वर्षभरानंतरही कारवाई नाही


शुक्रवार दि. ५ ऑगस्ट २०२४
केनवडात नागरिकांच्या जीवाशी खेळ...
आरोग्य विभागाचा भोंगळ कारभार !

**जैविक कचरा मात्र रस्त्यावरी, कार्यवाही हत्यापोटी दुरवरी**

**ग्रामीण उपकेंद्र हाकेच्या अंतरावर; 'हप्त्यापोटी' कारवाई शून्यावर**

घातक जैविक कचरा जाळला जात असलेले ठिकाण हे ग्रामीण आरोग्य उपकेंद्रापासून अवघ्या हाकेच्या अंतरावर असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. तरीही हा प्रकार वर्षभरापासून सुरू असल्याचा आरोप असून, संबंधित यंत्रणेकडून ठोस कारवाई झालेली दिसत नाही. त्यामुळे परिसरात विविध चर्चांना उधाण आले असून, काही नागरिकांकडून 'हप्त्यापोटी कारवाई होत नाही का?' असा सवाल उपस्थित केला जात आहे. संबंधित विभागाने या परिसराची नियमित पाहणी केली का? तक्रारींची दखल घेतली का? नियमभंग आढळूनही कारवाई का झाली नाही? अशा प्रश्नांची उत्तरे आता नागरिक मागत आहेत. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती समोर आणावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

जैविक वैद्यकीय कचऱ्याची शास्त्रशुद्ध पद्धतीने विल्हेवाट लावणे प्रत्येक दवाखान्यासाठी बंधनकारक आहे. त्यामुळे या प्रकरणाची संबंधित आरोग्य विभाग आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाने चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी. नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

---

# महावितरण अकोला मडळात, बदली प्रकरणात नियमाचे उल्लंघन, देवाण घेवाणीतून वसुलीचे अवलंबन !

**सहाय्यक अभियंता बदली प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशीची मागणी**

**सिटी न्युज ब्युरो @ कारंजा**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण) अकोला मंडळातील सहाय्यक अभियंता यांच्या बदली प्रक्रियेत नियमांचे उल्लंघन झाल्याचा आरोप करत विधान परिषद सदस्य आ. धर्मराज बावनसिंग महाराज (राठोड) यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली आहे.

बदली आदेशानंतर काही अधिकाऱ्यांच्या आदेशांमध्ये करण्यात आलेल्या श्दर्ग्ग्रिदह मुळे पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. प्रतीक्षा यादीतील पात्र अधिकाऱ्यांना संधी न देता काही निवडक अधिकाऱ्यांना लाभ देण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.तसेच आदेशानंतरही काही अधिकारी नियुक्त ठिकाणी रुजू झाले नसल्याने या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

बदली धोरणानुसार पात्र अधिकाऱ्यांना न्याय देण्यात यावा आणि संपूर्ण प्रक्रियेची दक्षता विभागामार्फत चौकशी करण्यात यावी, अशी विनंती आ. बावनसिंग महाराज यांनी केली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
शनिवार, दि. २७ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## व्हायरस आल्याने शेतकऱ्यांनी उपटून फेकली मिरची

**बुलढाणा :** तालुक्यातील मासरूळ परिसरात शेतकऱ्यांनी एप्रिल महिन्यात मोठ्या प्रमाणात मिरचीची लागवड केली होती. त्यावर लाखो रुपये खर्च केला होता. मात्र, पावसाळा लांबल्याने उष्णतेने मिरचीवर अनेक प्रकारचे व्हायरस आल्याने शेतकऱ्यांनी मिरची उपटून फेकल्याने त्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. उष्णतेमुळे मिरचीच्या झाडांवर कोकडा सारखा रोग येवून फुलकळी विनाच झाडे पोसावी लागली. झाडे डोलदार झाली, मात्र फुलकळी आणि मिरची नाहीशी झाली. मिरचीच्या उत्पादनासाठी लागवड करून खत, औषधी फवारणी तसेच विकतचे पाणी आणून मिरची जोपासली. ३ महिने उन्हा-तान्हात ठिबक, मल्चींग, मिरचीचे रोप, मजुरी, फवारणी व खते असा लाखो रुपये खर्च करून अखेर सर्व प्रयत्न निष्फळ ठरल्याने अखेर शेतकऱ्यांच्या पदरी निराशा पडली.

# जिल्ह्याला अवकाळीच्या नुकसानभरपाईसाठी 11 कोटी!

### ◆ शेतकऱ्यांना दिलासा : ऐन पेरणीच्या तोंडी मदत जाहीर झाले शेतकरी आनंदी

प्रतिनिधी २७ जून

**बुलढाणा :** राज्यात मार्च २०२६ मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतीपिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने अकोला, बुलढाणा आणि भंडारा जिल्ह्यांसाठी एकूण १३ कोटी २७ लाख ९८ हजार रुपयांच्या मदतीस मंजुरी दिली आहे. यामध्ये बुलढाणा जिल्ह्याला सर्वाधिक १०.९९ कोटीचा निधी मिळाला आहे.

आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय २५ जून २०२६ रोजी मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी निर्गमित केला आहे. भरपाईची रक्कम थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात डीबीटी प्रणालीद्वारे जमा करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

शासन निर्णयानुसार तिन्ही जिल्ह्यांतील १४ हजार ७१६ बाधित शेतकऱ्यांच्या ७ हजार ९३४.७२ हेक्टर क्षेत्रावरील शेतीपिकांच्या नुकसानीसाठी ही मदत वितरित केली जाणार आहे. यामध्ये बुलढाणा जिल्ह्याला सर्वाधिक निधी मंजूर करण्यात आला आहे. निधी वितरण प्रक्रियेदरम्यान कोणत्याही लाभार्थ्याची दुबार गणना होणार नाही, याची जिल्हाधिकारी व तहसीलदार कार्यालयांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश शासनाने दिले आहेत. एका हंगामात एकदाच विहित दरानुसार मदत दिली जाणार आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांना मंजूर

**असा करण्यात येणार निधी वितरित**
बुलढाणा जिल्ह्यातील १२ हजार ५२ बाधित शेतकऱ्यांच्या ६ हजार ६१०.६३ हेक्टर क्षेत्रावरील पिकांच्या नुकसानीपोटी १० कोटी ९९ लाख ३९ हजार रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. अकोला जिल्ह्यातील १ हजार ४७६ शेतकऱ्यांच्या ९७५. ३१ हेक्टर क्षेत्रासाठी १ कोटी ६९ लाख २६ हजार रुपये, तर भंडारा जिल्ह्यातील १ हजार १८८ शेतकऱ्यांच्या ३४८.७८ हेक्टर क्षेत्रासाठी ५९ लाख ३३ हजार रुपये निधी वितरित करण्यात येणार आहे.

झालेली मदत बँकांनी कर्जवसुलीसाठी अथवा इतर कोणत्याही कारणासाठी अडवू नये, यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व बँकांना आवश्यक सूचना देण्याचे आदेशही शासनाने दिले आहेत. मदत वितरणाची प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांची यादी आणि मदतीचा सविस्तर तपशील संबंधित जिल्ह्यांच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. तसेच निधीच्या खर्चाचे लेखापरीक्षण आणि ताळमेळाची जबाबदारी संबंधित विभागीय आयुक्तांकडे सोपविण्यात आली आहे. शासनाने तातडीने पंचनामे करून आर्थिक मदतीस मंजुरी दिल्यामुळे अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी सांगितले.

## जिल्हा आरोग्य विभागाची धुरा आता मातृतीर्थाच्या सुपुत्राकडे

प्रतिनिधी २७ जून

**दुसरबीड :** जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या जिल्हा आरोग्य अधिकारी (डीएचओ) पदाची धुरा जिल्ह्याचे सुपुत्र तथा सिंदखेडराजा तालुक्यातील पळसखेड चक्का येथील रणजीत मंडाले यांच्या हाती सोपविण्यात आली आहे. शासनाने नुकतेच त्यांच्या नियुक्तीचे आदेश जारी केले आहे. यवतमाळ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी देऊळगाव राजा तालुक्यातील ग्रामीण रुग्णालय, देवळगाव मही येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून आपल्या सेवेला प्रारंभ केला. त्यानंतर मातृतिर्थ सिदखेड राजा तालुक्यातील मलकापूर-पांग्रा प्राथमिक आरोग्य केंद्रात तसेच मेहकर येथे तालुका आरोग्य अधिकारी म्हणून याआगोदर त्यांनी यशस्वीपणे जबाबदारी सांभाळली. त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत शासनाने त्यांची अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारीपदी नियुक्ती केली होती. जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर शासनाच्या सर्व आरोग्य योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यास प्राधान्य देणार असल्याचे डॉ. मंडाले यांनी सांगितले. जिल्ह्यातील आरोग्य सेवा अधिक गुणवत्तापूर्ण, गतिमान आणि लोकाभिमूख करण्यासाठी सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने काम करण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

## खासगी कोचिंग क्लासेसचे 'फायर ऑडिट' कडे दुर्लक्ष!

### ◆ खामगाव, मलकापुरात नियमांची सर्रास पायमल्ली!

प्रतिनिधी २७ जून

**खामगाव:** उत्तर प्रदेशातील लखनौ येथे खासगी कोचिंग संस्थेत लागलेल्या आगीत १५ विद्यार्थ्यांचा होरपळून मृत्यू उडाली असताना, खामगाव, मलकापूर शहरातील अनेक खासगी कोचिंग क्लासेसमध्ये अग्निसुरक्षेच्या नियमांची सर्रास पायमल्ली होत असल्याचे चित्र समोर येत आहे. विशेष म्हणजे, अनेक क्लासेसकडे फायर ऑडिट प्रमाणपत्र नसतानाही ते शेकडो विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात घालून शिकवणी वर्ग चालवत आहेत. झाल्याच्या घटनेने देशभरात खळबळ खामगाव

**परवानगीशिवाय भरविले जातात शिकवणी वर्ग**
खामगाव शहरात अनेक खासगी शिकवणी वर्ग कोणत्याही आवश्यक परवानग्यांशिवाय सुरू असल्याची चर्चा आहे. अग्निसुरक्षा प्रमाणपत्र, स्थानिक स्वराज्य संस्थेची परवानगी, इमारतीचे संरचनात्मक सुरक्षा प्रमाणपत्र आदी नियमांचे पालन होत आहे का, याची पडताळणी करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याची मागणी पालक व नागरिकांकडून होत आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांवर कठोर कारवाई करावी, अशीही मागणी जोर धरत आहे.

शहरातील अमृत नगर, नांदुरा रोड, सिव्हिल लाईन, नॅशनल हायस्कूल परिसर, नटराज गार्डन, समता कॉलनी आदी भागांत अत्यंत अरुंद व खुराड्यासारख्या जागेत अनेक कोचिंग क्लासेस भरविले जात आहेत. काही ठिकाणी एकच प्रवेशद्वार, अपुरे वायुवीजन, अग्निशमन यंत्रांचा अभाव, आपत्कालीन बाहेर पडण्याचा मार्ग नसणे अशा गंभीर त्रुटी असूनही संबंधित यंत्रणांकडून प्रभावी तपासणी होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. विद्यार्थ्यांची वाढती संख्या लक्षात घेता अशा संस्थांची नियमित तपासणी करून फायर ऑडिट, इमारतीची सुरक्षितता आणि आपत्कालीन उपाययोजनांची पडताळणी करणे आवश्यक असताना संबंधित प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याची भावना पालकांमध्ये व्यक्त होत आहे. मोठी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा सवालही उपस्थित केला जात आहे.

## एमआरपीपेक्षा जास्त दराने बियाणे विक्री करणाऱ्यांवर कारवाई करा!'

### ◆ जळगाव जामोदमध्ये कृषी अधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी २७ जून

**जळगाव जामोद:** तालुक्यातील काही कृषी केंद्रांमधून बी-बियाण्यांची छापील कमाल किरकोळ किमतीपेक्षा (एमआरपी) अधिक दराने विक्री होत असल्याचा आरोप करत, शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालयात धडक दिली. याप्रसंगी दोषी कृषी केंद्र चालकांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करीत निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, खरीप हंगाम सुरू झाल्याने शेतकरी मोठ्या प्रमाणावर बियाणे खरेदीसाठी कृषी केंद्रांमध्ये जात आहेत; मात्र काही कृषी केंद्र चालकांकडून कृत्रिम टंचाई निर्माण करून बी-बियाण्यांची एमआरपीपेक्षा अधिक दराने विक्री केली जात आहे, तसेच अनेक ठिकाणी शेतकऱ्यांना पक्के बिल देण्यास टाळाटाळ केली जात असल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

या प्रकारामुळे आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांची आर्थिक लूट होत असून, त्यांना अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांनी तालुका कृषी विभागाकडे तालुक्यातील सर्व कृषी केंद्रांची तातडीने तपासणी करावी, एमआरपीपेक्षा जास्त दराने बियाणे विक्री करणाऱ्या कृषी केंद्रांचे परवाने रद्द करावेत, प्रत्येक कृषी केंद्रावर बियाण्यांचा उपलब्ध साठा व अधिकृत किंमत दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक करावे, तसेच प्रत्येक खरेदीचे पक्के बिल देण्याची सक्ती करावी, अशा मागण्या केल्या आहेत. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन दोषी कृषी केंद्र चालकांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अन्यथा शेतकऱ्यांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. या निवेदनावर कार्तिक राजपूत, प्रकाश भिसे, अशपाक देशमुख, राजेंद्र परिहार, विलास दातार, जयप्रकाश वाघ यांच्यासह अनेक शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## पत्नीचा छळ; शिक्षक पतीविरुद्ध गुन्हा दाखल

### ◆ पगार, एटीएम ताब्यात घेण्यासह पैशांची मागणी

प्रतिनिधी २७ जून

**मलकापूर:** पगाराचे पैसे स्वतःच्या ताब्यात देण्यास भाग पाडणे, एटीएम कार्ड स्वाधीन करण्याची सक्ती करणे आणि प्लॉट खरेदीसाठी माहेरहून पैसे आणण्याची मागणी करत पत्नीचा शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी एका शिक्षकाविरुद्ध मलकापूर शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पीडित महिला तलाठी म्हणून कार्यरत आहेत.

सविता अरविंद सावळे (३६, रा. विठ्ठलनगर, मलकापूर) यांचा विवाह १० मे २०१६ रोजी पिंपळपाटी (ता. मोताळा) येथील अरविंद पंढरी सावळे याच्याशी झाला होता. आरोपी अरविंद सावळे हा आसलगाव येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षक आहे.

**प्लॉटसाठी पैशांची मागणी**
विवाहानंतर काही दिवसांनीच अरविंद सावळे याने संपूर्ण पगार व एटीएम कार्ड स्वतःच्या ताब्यात देण्याचा दबाव टाकला, तसेच पीडितेचा पगार असतानाही घरखर्च त्यांच्याच उत्पन्नातून करण्यात येत असल्याचेही नमूद केले. बुलढाण्यात प्लॉट खरेदी करण्यासाठी १ लाख २० हजार रुपयांची रक्कम घेतली. त्यानंतर उर्वरित रकमेच्या परतफेडीसाठी दरमहा १२ हजार रुपये पगारातून देण्याचा तगादाही लावल्याचे तक्रारीत नमुद आहे.

**समुपदेशनानंतर गुन्हा दाखल**
पतीच्या सततच्या छळाला कंटाळून सविता सावळे या १५ मार्च २०२६ पासून विभक्त राहत आहेत. भरोसा सेलकडील समुपदेशनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर २५ जून रोजी त्यांनी मलकापूर शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## महा-टीईटी परीक्षा रविवारी; जिल्हा प्रशासन सज्ज..

### ◆ २२ केंद्रावर १२ हजाराहून अधिक परीक्षार्थी

प्रतिनिधी २७ जून

**बुलढाणा :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने रविवार, २८ जून रोजी आयोजित शिक्षक पात्रता परीक्षा अर्थात महा-टीईटी परीक्षेसाठी बुलढाणा जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. बुलढाणा शहर व परिसरातील २२ परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा घेतली जाणार असून १२ हजाराहून अधिक विद्यार्थी या परीक्षेला प्रविष्ट होणार आहेत. परीक्षेच्या सुरळीत आयोजनासाठी प्रशासकीय यंत्रणेने जय्यत तयारी केली आहे.

सर्व केंद्रांवर केंद्र संचालक, सहायक परिरक्षक व अन्य कर्मचारी वर्गाची नियुक्ती



करण्यात आली आहे. परीक्षा केंद्रांवर पुरेसा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, गैरप्रकार टाळण्यासाठी सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्यात आली आहे. तसेच फ्रीस्किंग व बायोमेट्रिक पडताळणीची व्यवस्थाही सज्ज ठेवण्यात आली आहे. परीक्षेसाठी नियुक्त केंद्र संचालक व परिरक्षकांची प्रशिक्षण कार्यशाळा २५ जून रोजी जिल्हा परिषदेच्या छत्रपती श्री शिवाजी महाराज सभागृह, बुलढाणा येथे पार पडली. यावेळी परीक्षेच्या संदर्भातील सर्व कार्यवाहीबाबत उपस्थित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. परीक्षेदरम्यान कोणत्याही परीक्षार्थीला विनाकारण त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी, अशा सूचना शिक्षणाधिकारी प्राथमिक विकास पाटील यांनी दिल्या. परीक्षा

परिषदेच्या वतीने आयोजित व्हीसी मध्येही सर्व केंद्र संचालकांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. या प्रशिक्षण कार्यशाळेला झोनल अधिकारी म्हणून ज्येष्ठ अधिव्याख्याता मारुती उपशिक्षणाधिकारी जगन मुंडे, परमेश्वर शिरसागर, अनिल देवकर, अखिल इब्राहिम शेख उपस्थित होते. या परीक्षेसाठी परिरक्षक म्हणून गट शिक्षण अधिकारी चिखली उमेश जैन हे काम पाहत आहेत. जिल्हा नियंत्रण कक्षाकडून परीक्षार्थीसाठी काही विशेष सूचना देण्यात आल्या आहेत.

**दीड तास अगोदर केंद्रावर पोहोचणे बंधनकारक..**
बायोमेट्रिक व फ्रीस्किंग प्रक्रियेला वेळ लागणार असल्याने विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या दीड तास अगोदर केंद्रावर पोहोचणे बंधनकारक आहे. कोणत्याही प्रकारचे इलेक्ट्रॉनिक साहित्य, मोबाईल, घड्याळ, पेजर जवळ बाळगण्यास सक्त मनाई आहे. परीक्षागृहात शूज घालून प्रवेश दिला जाणार नाही. हिजाब किंवा बुरखा घालण्यास मनाई नसली तरी परीक्षागृहात परीक्षार्थीना मानेच्या वरील संपूर्ण भाग उघडा ठेवावा लागेल, अशा सूचना परीक्षा परिषदेने दिल्या आहेत.

## विजेच्या धक्क्याने खेर्डा खुर्दच्या तरुणाचा मृत्यू

### ◆ शेतातील पेरणीदरम्यान दुर्घटना, गावात हळहळ

प्रतिनिधी २७ जून

**जळगाव जामोद:** तालुक्यातील खेर्डा खुर्द येथील २० वर्षीय तरुणाचा शेतात पेरणीचे काम असताना विजेचा करत धक्का लागून मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी (दि. २६) घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, विद्युत यंत्रणेच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, खेर्डा खुर्द येथील संकेत प्रभाकर वेरुळकर हा आनंदा श्रीरंग वेरुळकर यांच्या गट क्रमांक ८५ मधील वनूर शिवारात पेरणीच्या कामासाठी गेला होता. यावेळी शेतातील विजेच्या खांबाच्या ताणाच्या संपर्कात आल्याने त्याला विजेचा धक्का बसला. घटना लक्षात येताच विजय वासनकर व इतर नागरिकांनी संकेतला जळगाव जामोद येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले; मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले. या घटनेने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला.

**सैन्य भरतीचे स्वप्न अधुरेच!**
संकेत हा भारतीय सैन्य भरतीची तयारी करत होता. त्याने भरती प्रक्रियेतील मैदानी चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण केली होती. पुढील काही दिवसांत त्याची लेखी परीक्षा होणार होती; मात्र या घटनेमुळे देशसेवेचे त्याचे स्वप्न अपूर्ण राहिले.

**'महावितरण'वर प्रश्नचिन्ह**
शेतशिवारातील विद्युत यंत्रणेच्या सुरक्षिततेबाबत नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे. अनेक ठिकाणी विद्युत खांब, लोंबकळणाऱ्या तारांमुळे धोका निर्माण होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला.

## जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे विशेष त्रुटी पूर्तता शिबिर

प्रतिनिधी २७ जून

**बुलढाणा :** राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याअंतर्गत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, बुलढाणा यांच्या वतीने 'राजर्षी शाहू महाराज जयंती पर्व' निमित्त विशेष त्रुटी पूर्तता शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे विशेष शिबिरास शुक्रवार २६ जून ते ३ जुलै २०२६ या कालावधीत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, बुलढाणा कार्यालयात आयोजित करण्यात आले असून, विद्यार्थ्यांच्या जात वैधता प्रमाणपत्रासंबंधी प्रलंबित प्रकरणांतील त्रुटी दूर करण्यासाठी ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) २०२६ चा निकाल जाहीर झाल्यानंतर उच्च शिक्षण व विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक आहे. तसेच इयत्ता ११ वी व १२ वी विज्ञान शाखेत नव्याने प्रवेश घेणारे तसेच डिप्लोमा तृतीय वर्षात प्रवेशित झालेले आणि अद्याप जात वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर न केलेल्या विद्यार्थ्यांसाठी अर्ज स्वीकारण्यासाठी विशेष खिडकीची व्यवस्था करण्यात आली आहे. याशिवाय, त्रुटीमुळे प्रलंबित असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रम, इयत्ता ११ वी व १२ वी विज्ञान शाखा तसेच डिप्लोमा तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी समितीमार्फत ई-मेल, एसएमएस आणि पत्राद्वारे सूचना देण्यात आल्या आहेत. या विशेष शिबिराचा लाभ घेऊन संबंधित विद्यार्थ्यांनी आपल्या प्रकरणांची पूर्तता करावी, असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे अध्यक्ष नरेंद्र फुलझेले, उपायुक्त तथा सदस्य अमोल यावलीकर आणि संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव मनोज मेरत यांनी केले आहे.

## मुख्य जलवाहिनी फुटली

### ◆ लाखो लिटर पाणी वाया, नागरिक तहानलेलेच

प्रतिनिधी २७ जून

**देऊळगाव राजा :** शहरात पाणीटंचाईने नागरिक हैराण झाले असतानाच नगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचा नियोजनशून्य कारभार पुन्हा एकदा समोर आला आहे. जाफराबाद रोडवरील मुख्य पाणी वितरण केंद्राजवळील जलवाहिनी फुटल्याने लाखो लिटर पाणी रस्त्यावर वाहून जात असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. एका शहरातील बाजूला नागरिकांना तब्बल पंधरा ते वीस दिवसांनी पिण्याचे पाणी मिळत आहे, तर दुसऱ्या बाजूला पाणी धबधब्यासारखे वाहून जात आहे. संबंधित विभागाच्या दुर्लक्षामुळे फुटलेल्या जलवाहिनीची वेळेत दुरुस्ती करण्यात आलेली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. शहरात वारंवार जलवाहिन्या फुटणे, गढूळ पाणीपुरवठा, मोटारी बंद पडणे, निकृष्ट दर्जाच्या पाईपचा वापर आणि अपुऱ्या जलवाहिन्यांमुळे क्षमतेच्या पाणीपुरवठा विस्कळीत होत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. याशिवाय काही भागांना प्राधान्याने पाणीपुरवठा केला जात असल्याच्याही तक्रारी होत असून सर्वसामान्य नागरिकांमध्ये प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. 'धरण उशाला आणि कोरड घशाला अशी अवस्था झाली आहे. लाखो लिटर पाणी वाया जात असताना नागरिकांना मात्र पाण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे,' अशी प्रतिक्रिया संतप्त नागरिकांनी व्यक्त केली. फुटलेल्या जलवाहिनीची तातडीने दुरुस्ती करून शहराला नियमित पाणीपुरवठा करावा तसेच संबंधित जबाबदार अधिकारी आणि करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली कर्मचाऱ्यांवर कारवाई आहे.

## राष्ट्रमाता जिजाऊंच्या पुण्यतिथीनिमित्त जिजाऊ रथयात्रा ; मनोज जरांगे पाटील यांना निमंत्रण

प्रतिनिधी २७ जून

**सिंदखेडराजा :** राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या ३५२ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या 'मातृतीर्थ सिंदखेडराजा ते पाचाड (किल्ले रायगड)' या ऐतिहासिक जिजाऊ रथयात्रेची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. यायात्रेत सहभागी होण्यासाठी मराठा संघर्ष योद्धे मनोज दादा जरांगे पाटील यांना निमंत्रण देण्यात आले आहे. यानिमित्त अंतरवाली सराटी येथे त्यांच्या निवासस्थानी सदिच्छाभेट घेऊन रथयात्रेची माहिती देण्यात आली तसेच नियोजन व उद्देशाबाबत चर्चा करण्यात आली.

राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जीवनकार्य, विचार आणि स्वराज्याच्या प्रेरणेचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे तसेच सामाजिक ऐक्याचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविणे हा या रथयात्रेचा प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. राष्ट्रमाता जिजाऊ यांची जन्मभूमी असलेल्या मातृतीर्थ सिंदखेडराजा येथील श्रीमंत राजे लखोजीराव जाधव यांच्या ऐतिहासिक राजवाड्यात असलेल्या राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या पूर्णाकृती प्रतिमेचे पूजन व अभिवादन करून ५ जुलै रोजी सकाळी ८.३० वाजता जिजाऊ रथयात्रेला प्रारंभ होणार आहे. ९ जुलै रोजी रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या पाचाड येथील राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या समाधीस्थळी अभिवादन व पूजन करून रथयात्रेचा समारोप होणार आहे. रथयात्रेचा मार्ग सिंदखेडराजा जालना- अंबड-शहागड गेवराई - बीड मांजरसुंबा पाटोदा जामखेड

कर्जत राशीन भिगवण बारामती-माळेगाव बुद्रुक फलटण लोणंद- खंडाळा शिरवळ भोईंज मेढाघाट महाबळेश्वर - प्रतापगड - पोलादपूर महाड - पाचाड असा राहणार आहे. यात्रेदरम्यान बीड येथे सकल मराठा समाजाच्या आशीर्वाद मंगल कार्यालयात, बारामती येथे जिजामाता भवनात, भोईंज येथे जिजामाता हायस्कूलमध्ये तसेच महाड येथे स्वागत व मुक्कामाची व्यवस्था करण्यात आली आहे. दि. ९ जुलै रोजी सकाळी ९ वाजता पाचाड येथे राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या समाधीस्थळी पूजन करण्यात येणार असून त्यानंतर पाचाड ग्रामपंचायतीतर्फे प्रीतीभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे. या रथयात्रेत अठरा पगड जातींसह विविध समाजघटक, जिजाऊभक्त, शिवप्रेमी, इतिहासप्रेमी तसेच विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शनिवार, दि. २७ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# ताटातील भात आणि पोळी झाली महाग

प्रतिनिधी २७ जून

**अकोला :** सर्वसामान्यांच्या स्वयंपाक घरातील मुख्य अन्न असलेल्या गहू आणि तांदळाचे भाव सातत्याने वाढत आहेत बाजारात गव्हाचे भाव प्रति क्विंटल १०० ते १५० रुपयांनी वाढले आहेत तर गेल्या दोन महिन्यात धान्य बाजारात तांदळाच्या दरात लक्षणीय वाढ झाली आहे मागील दोन महिन्यात तांदळाच्या दरात प्रति किलो दहा रुपयांनी वाढ झाली आहे आश्चर्याची गोष्ट म्हणजे जानेवारीत नवीन तांदळाचे पीक आल्यानंतरही दर कमी होण्याची फारशी आशा नाही व्यापाऱ्यांच्या मते जोपर्यंत बाजारात नवीन पिकाची जोरदार आवक सुरू होत नाही आणि सरकारच्या बफर स्टॉकची स्थिती स्पष्ट होत नाही तोपर्यंत ग्राहकांना या महागाईतून मोठा दिलासा मिळण्याची शक्यता नाही गेल्या दोन वर्षापासून मान्सूनच्या आगमनाला झालेल्या विलंबामुळे पेरणी आणि उत्पादनावर परिणाम झाला असून साठ्यावरही परिणाम झाला आहे सणासुदीच्या आणि लग्नसराईच्या हंगामामुळे बाजारात अन्नधान्याला स्थिर मागणी आहे.

## ♦ दोन महिन्यात दहा रुपयांनी वाढले तांदळाचे भाव





## चिन्नोर आणि जय श्रीराम तांदळाला जास्त मागणी

मध्यम आणि उच्च वर्गामध्ये लोकप्रिय असलेल्या जय श्रीराम तांदळाचा भाव दोन महिन्यापूर्वीच्या ५२ रुपये प्रति किलो वरून आता ६२ रुपये प्रति किलो झाला आहे त्याचप्रमाणे सुगंधी चिनोर तांदळाचा भाव ही ७० रुपयावरून ७६ रुपये प्रति किलो झाला आहे. दरम्यान गेल्या तीन महिन्यात उत्तम प्रतीच्या बासमती तांदळाच्या दरात प्रति किलो १५ ते २० रुपयांची लक्षनिय वाढ झाली आहे पूर्वी ८० ते १३० रुपये प्रति किलो दराने विकला जाणारा बासमती तांदूळ आता १०० ते १५० रुपये प्रति किलो दराने विकला जात आहे व्यापाऱ्यांच्या मते शहरात बासमती तांदळाचा मुख्य पुरवठा पंजाब आणि दिल्लीतून होतो

## गव्हाच्या सुद्धा वाढल्या किमती

सर्वसामान्यांच्या स्वयंपाक घरातील मुख्य अन्न असलेल्या गव्हाचे भावही सातत्याने वाढत आहेत बाजारात गव्हाचे भाव प्रतिक्विंटल शंभर ते दीडशे रुपयांनी वाढले आहेत या दरवाढीमुळे बाजारात गव्हाच्या विविध प्रकारांचे भाव सामान्य प्रकारासाठी प्रतिक्विंटल २१०० पासून ते उत्तम प्रतीच्या गव्हासाठी प्रति क्विंटल ६१५० रुपयांपर्यंत पोहोचले आहेत येत्या काळात सर्वसामान्यांचे रोजचे अन्न आणखी महाग होऊ शकते अशी शक्यता वर्तवली जात आहे

# मोर्णा नदीचे अस्तित्व येताहे धोक्यात !

## ♦ जलकुंभीमुळे वातावरण दूषित, कीटकजन्य रोग पसरण्याची भीती

प्रतिनिधी २७ जून

**अकोला :** शहराची ओळख असलेली मोर्णा नदीचे अस्तित्वच धोक्यात येत असल्याचे दिसून येत आहे. शहरातील सर्व घाण पाणी व प्लास्टिकचा कचरा नदीत सोडण्यात येत असल्याने हे पाणी दूषित झाले आहे. तसेच मोठ्या प्रमाणात जलकुंभी वाढल्यामुळे पाण्याला दुर्गंधी सुटली असून, नदीकाठच्या परिसरात कीटकजन्य आजार पसरण्याची भीती नागरिकांमधून व्यक्त करण्यात येत आहे.

मोर्णा नदी हे केवळ अकोलेकरांसाठी पाण्याचे संवर्धन करणारे साधन नसून, शहराची सांस्कृतिक आणि भौगोलिक ओळख आहे. परंतु, गेल्या काही काळापासून प्रशासनाचे दुर्लक्ष आणि सातत्याने वाढणारे प्रदूषण यामुळे या नदीचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. सध्या नदीपात्राला 'जलकुंभी' या वनस्पतीचा प्रचंड विळखा बसला असून, संपूर्ण नदीचे पात्र हिरवेगार बनले आहे. या जलकुंभीमुळे आणि



साचलेल्या कचऱ्यामुळे अनेक गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत.

काही दिवसापूर्वी राबवण्यात आलेल्या मोर्णा नदी स्वच्छता मोहिमेला अकोलेकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला होता, मात्र सातत्यपूर्ण देखभालीअभावी परिस्थिती पुन्हा 'जैसे थे' झाली आहे. आता पावसाळ्याचे दिवस जवळ येत असल्याने नदीपात्र मोकळे न केल्यास पूरपरिस्थिती निर्माण होण्याचा आणि शहरात साथीचे आजार पसरण्याचा मोठा धोका आहे. त्यामुळे यावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी शहरवासीयांकडून होत आहे.

१) जलप्रदूषण आणि दुर्गंधी : जलकुंभीमुळे पाण्याचा प्रवाह पूर्णपणे थांबला असून, पाणी सडून परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली आहे. हवेच्या झोतामुळे ही दुर्गंधी सर्वत्र पसरत असल्याने या भागातील नागरिकांना नाकाला रूमाल बांधूनच राहावे लागत आहे.

२) आरोग्याचा प्रश्न : साचलेल्या दूषित पाण्यामुळे डास व इतर कीटकांचे प्रमाण कमालीचे वाढले असून, शहरात डेंग्यू, मलेरिया आणि चिकनगुनिया यांसारख्या आजारांची साथ पसरण्याची भीती निर्माण झाली आहे.

३) जलचरांचा अंत : पाण्यातील ऑक्सिजनचे प्रमाण कमी झाल्यामुळे नदीतील जलचरांचे अस्तित्व संपत चालले आहे. नदीपात्रातील जैवविविधता धोक्यात आली आहे.

# सध्या बाजारपेठेत 10 आणि 20 रुपयांच्या नोटांचा तुटवडा

## ♦ चिल्लर पैशांसाठी विक्रेता आणि ग्राहकांमध्ये वाद







प्रतिनिधी २७ जून

**अकोला :** आज बाजारात काहीही वस्तू विकत घ्यायची असल्यास दुकानदार आधी विचारतो चिल्लर आहे का? कारण सध्या बाजारपेठेत १०, २० आणि ५० रुपयांच्या नोटांची प्रचंड टंचाई निर्माण झाली असून, यामुळे सर्वसामान्य नागरिक आणि छोटे व्यापारी कमालीचे त्रस्त झाले आहेत. याच टंचाईच्या पार्श्वभूमीवर, सरकार आता या नोटा पूर्णपणे बंद करून त्याऐवजी केवळ नाणी चलनात आणणार असल्याची जोरदार अफवा बाजारपेठांमध्ये पसरली आहे.सरकारने छोट्या नोटा बंद करू नये अशी व्यापाऱ्यांची मागणी आहे. दुसरीकडे रिझर्व्ह बँकेची अधिकृत अधिसूचना येणार नाही, तोपर्यंत बाजारपेठेत छोट्या नोटांचे चलन सुरूच राहतील, असे या क्षेत्रातील तज्ज्ञांनी सांगितले.

**डिजिटल पेमेंटचे प्रमाण वाढले**

काही महिन्यांपूर्वी एटीएममधून छोट्या नोटा उपलब्ध करून देण्याची घोषणा झाली होती, मात्र या प्रकल्पाबाबत सध्या कोणतीही हालचाल दिसत नसल्याने नागरिक संतप्त आहेत. डिजिटल पेमेंटचे प्रमाण वाढले असले, तरी दैनंदिन छोट्या गरजांसाठी लोक अजूनही रोख रकमेवर अवलंबून आहेत. १००, २०० आणि ५०० च्या नोटा सहज मिळतात, पण छोट्या नोटा गायब झाल्या आहेत. यापूर्वीही चलनी नोटांबाबत अनेकदा अफवांचे पेव फुटले होते. मात्र, रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार जोपर्यंत अधिकृत अधिसूचना येत नाही, तोपर्यंत या केवळ अफवाच ठरतात. डिजिटल पेमेंट वाढले तरी ग्रामीण आणि निमशहरी भागातील बाजारपेठा आजही पूर्णपणे छोट्या रोख नोटांवरच अवलंबून आहे.

**लोकांमध्ये चलनी नाणे स्वीकारण्याची अनास्था**

बँकांकडून छोट्या नोटांचा पुरवठा जवळपास शून्य झाल्याने दैनंदिन नकद व्यवहार, भाजीपाला, किराणा खरेदी आणि स्थानिक वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे. सुट्टया पैशांवरून ग्राहक आणि व्यापाऱ्यांमध्ये रोज खटके उडत आहेत. छोट्या नोटांऐवजी नाण्यांचा वापर वाढवण्याचे प्रयत्न अपयशी ठरले आहेत. बाजारपेठेत पुरेशी नाणी उपलब्ध नाहीत आणि नाण्यांमुळे खिसा जड होतो म्हणून लोकांमध्येही ती स्वीकारण्याची अनास्था दिसून येत आहे.

# हिवरखेड येथे तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

प्रतिनिधी २७ जून

**हिवरखेड :** पोलिस स्टेशन हद्दीतील दुधे नगरातील रहिवासी रुपराव शेंडे यांचा तरुण मुलगा लिलाधर शेंडे (३५) याने २६ जूनच्या दुपारी आपल्या राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेबाबत परिसरात उलट सुटल चर्चांना उधाण आले आहे.

या प्रकरणी नातेवाईकांच्या फिर्यादवरुन पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. तरुणाच्या शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण समोर येईल, अशी माहिती सूत्रांकडून देण्यात आली. या घटनेचा तपास हिवरखेड ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली बीट अंमलदार करीत आहेत. तरुणांच्या आत्महत्येमुळे विविध चर्चांना उधाण फुटले असून पत्नी माहेरी गेल्याने वाद-विवाद वाढला किंवा व्यसनातून विविध विचारांना चालना मिळाली नेमके स्वतःच्या जीवाला संपवण्याचे काय कारण, अशी उलट सुलट चर्चा येथील रहिवाशी करीत आहेत.

# अज्ञात ट्रकच्या धडकेत एसटी चालक गंभीर जखमी ; दोन बोटांना फ्रॅक्चर

प्रतिनिधी २७ जून

**अकोट :** अकोट आगाराची अकोट-अकोला बस शुक्रवारी (दि. २६) रात्री साडेआठ वाजताच्या सुमारास अकोट बसस्थानकावरून अकोल्याकडे रवाना झाली असताना बैठकबार ते विजयनगर दरम्यान भीषण अपघात घडला. या अपघातात एसटी चालक विनायक वहेकर यांच्या हाताच्या दोन बोटांना गंभीर दुखापत होऊन फ्रॅक्चर झाल्याने त्यांना पुढील उपचारासाठी अकोला येथे रेफर करण्यात आले आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, अकोट-अकोला मार्गावरील प्रवासादरम्यान चालक विनायक वहेकर यांनी समोरून येणाऱ्या वाहनाला साईड दर्शविण्यासाठी हात बाहेर काढला होता. त्याचवेळी समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या अज्ञात ट्रकने बसला घासून जात चालकाच्या हाताला जोरदार धडक दिली. या धडकेत त्यांच्या हाताच्या दोन बोटांना गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर बसमधील प्रवासी आणि नागरिकांमध्ये काही काळ घबराटीचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच अकोट शहर पोलीस स्टेशनने तात्काळ दखल घेत घटनास्थळी पोलीस पथक रवाना केले. तसेच ॲम्ब्युलन्सच्या सहाय्याने जखमी चालकाला ग्रामीण रुग्णालय, अकोट येथे दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर त्यांच्या दुखापतीचे गांभीर्य लक्षात घेऊन पुढील उपचारासाठी अकोला येथे रेफर करण्यात आले. सध्या त्यांच्यावर अकोला येथे उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सूत्रांनी सांगितले.

दरम्यान, अकोट आगार व्यवस्थापकांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला असता त्यांचा संपर्क होऊ शकला नाही, अधिकृत प्रतिक्रिया मिळू शकली नाही. अपघात घडवून पसार झालेल्या अज्ञात ट्रक चालकाचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपास सुरू केला असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजचीही पडताळणी करण्यात येत आहे.

# गण गण गणात बोतेच्या गजरात दुमदुमली मेडशी नगरी

## श्री संत गजानन महाराज पालखीचे वाशिम जिल्ह्यात दमदार आगमन व भव्य स्वागत

प्रतिनिधी २७ जून

**मेडशी :** शेगांव येथून दर वर्षी श्री संत गजानन महाराज यांची पालखी आषाढी एकदशी करिता पंढरपूर कडे जात असते. या वर्षी पालखीचे हे ५७ वर्ष असून या वर्षी पालखीचं प्रस्थान झाल्या नंतर अकोला वाडेगांव पातूर मार्गे मेडशी ला २७ जून रोजी सकाळी ९ वाजताच्या वाशीम जिल्ह्यात प्रवेश केला. तिथून गावो गावी पालखीचे मोठ्या दिमाखात आणि जलोष्यात स्वागत केले.गावातील महिला,लहान मूल,मोठे माणसं गजानन महाराज ह्यांच्या पालखीचं आगमनाने उल्हासून जातात.मेडशी गावात सर्व प्रथम गावाच्या सुरवातीला असलेल्या हनुमान वाडीतील नागरिकांनी पालखीची स्वागत



केले.त्या नंतर शिवनेरी चौक येथील युवकांनी, महिलांनी रांगोळी काढून फटाखे फोडून आरती ओवाळून पालखीचे स्वागत केले.तसेच गांधी चौक येथे सुद्धा महिलानी पालखीचे स्वागत करत पुढे सिद्धी विनायक गणेश वेटाळ येथे गेली असता तेथील नागरिकांनी पालखीचे आरती ओवाळून आणि रांगोळी काढून स्वागत केलं. गावात पालखीची प्रवेश होतात टाळ मृदुंगच्या गजरात भाविक तलीन होऊन आणि कीर्तनाच्या आवाजाने सगळं गजानन महाराज भक्तिमय वातावरणात जाते. त्यानंतर श्री संत गजानन महाराज यांची पालखी परिसरातील नागरिकांसाठी वनविभागच्या प्रांगणात थांबून भक्ताकरिता बारी पद्धतीने दर्शनची व्यवस्था केली जाते.तर जिल्हा परिषद शाळेत पालखी मधील वारकरी आणि परिसरातील भविक भक्ताकरिता भोजनाची व्यवस्था मेडशी येथील नागरिकांकडून दरवर्षी करण्यात येते. तसेच या पालखी सोहळ्यात पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहत असतात,त्यामुळे गावाला यात्रेने स्वरूप येत असते.

# जि.प. निवडणुकीच्या तयारीला वेग ; कॉंग्रेसचे तालुकानिहाय प्रभारी, सहप्रभारी नियुक्त

प्रतिनिधी २७ जून

**यवतमाळ :** आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका तसेच मतदार यादीच्या विशेष पुनरावलोकन (एसआयआर) कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा कॉंग्रेस कमिटीने तालुकानिहाय प्रभारी व सहप्रभारींची नियुक्ती जाहीर केली आहे. जिल्हाध्यक्ष ॲड. सचिन नाईक यांनी गुरुवारी याबाबतचे आदेश जारी करून संबंधित पदाधिकाऱ्यांना तातडीने कामाला लागण्याच्या सूचना दिल्या आहेत. निवडणुकीच्या तयारीला गती देण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याची जबाबदारी वरिष्ठ नेते व पदाधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. राळेगावसाठी माजी मंत्री शिवाजीराव मोघे, घाटंजीसाठी खासदार प्रतिभा धानोरकर, दारव्ह्यासाठी माजी मंत्री वसंतराव पुरके, पांढरकवड्यासाठी आ. बाळासाहेब मांगुळकर, यवतमाळसाठी माजी आमदार किर्तीबाबू गांधी, कळंबसाठी वजाहत मिर्झा, महागावसाठी संध्या सव्वालाखे, मारेगावसाठी मनीष पाटील, उमरखेडसाठी प्रफुल्ल मानकर, बाभूळगावसाठी राहुल ठाकरे, दिग्रससाठी आरिज बेग मिर्झा, पुसदसाठी डॉ. मोहम्मद नदीम, झरी-जामणीसाठी तातू देशमुख, आर्णीसाठी अरविंद वाढोणकर आणि वणीसाठी ॲड. सचिन नाईक यांची प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

तसेच सीमा तेलंगे, पी. बी. आडे, संजय खाडे, शिवाजी देशमुख (सवनेकर), स्वाती येंडे, वंदना आवारी, टिकाराम कोंघरे, जावेद अन्सारी, समिना शेख, महेंद्र कावळे, अनिल गायकवाड, वैशाली सवई, राजीव कासावार, गौरव राठोड, ॲड. अनिल कनाके आणि अरुणा खंडाळकर यांच्यावर सहप्रभारी म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

मतदार यादी पुनरावलोकन, बूथनिहाय संघटनात्मक बांधणी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी पक्षाची तयारी अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने या नियुक्त्या करण्यात आल्याचे ॲड. सचिन नाईक यांनी सांगितले. नियुक्त पदाधिकाऱ्यांनी तात्काळ कामाला सुरुवात करावी, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# गाजीपूरमधील नियमबाह्य गौण खनिज उत्खननावर कारवाई ; अनेक खदानी बंद करण्याचे आदेश

वि.प्रतिनिधी २७ जून

**अकोट :** गाजीपूर शिवारातील गौण खनिज उत्खननातील गंभीर अनियमितता उघडकीस आल्यानंतर जिल्हा खनिकर्म विभागाने कठोर भूमिका घेत अनेक खदानींमधील उत्खनन तात्काळ बंद करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच संबंधित खदानी कायमस्वरूपी बंद करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. यासंदर्भात १५ जून २०२६ रोजी जिल्हा खनिकर्म विभागाकडे लेखी तक्रार दाखल करण्यात आली होती. या तक्रारीची दखल घेत जिल्हा खनिकर्म विभागाने १६ जून रोजी गाजीपूर येथील खदान क्षेत्राची प्रत्यक्ष पाहणी केली. तपासणीदरम्यान अनेक गंभीर त्रुटी आणि नियमभंग आढळून आले. शासकीय अधिकाऱ्यांच्या अहवालानुसार, बहुतांश खदानींची खोली निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक म्हणजे सरासरी सहा मीटरपेक्षा जास्त असल्याचे निदर्शनास आले. तसेच खदान क्षेत्राभोवती आवश्यक तारेचे कुंपण नसणे, पर्यावरणीय नियमांनुसार वृक्षारोपण न करणे आणि खदानींचे सीमांकन न करणे अशा अनेक अनियमितता आढळल्या. या पार्श्वभूमीवर जिल्हा खनिकर्म अधिकारी विशाल धांडे यांनी भीमराव कासदे (गट क्र. ३५ व ४१), रामरतन महादेव सोयाम (गट क्र. ३७), राजकुमार गोपालदास चांडक (गट क्र. ५१) तसेच सुमित्रा साहेबराव तोटे (गट क्र. ४१) यांच्या क्षेत्रातील उत्खनन तात्काळ बंद करण्याचे आदेश जारी केले आहेत. दरम्यान, अंबादास नागोराव पवार (गट क्र. ३७) यांच्या क्षेत्रातील उर्वरित उत्खनन मर्यादेचा ताळमेळ घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. उर्वरित सर्व खदानधारकांना यापुढे तात्पुरते परवाने देऊ नयेत तसेच संबंधित खदानी कायमस्वरूपी बंद करण्याचा अंतिम प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावा, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

याशिवाय संपूर्ण गाजीपूर शिवारात विनापरवानगी ब्लास्टिंग होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर थेट कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. या कारवाईमुळे परिसरातील नियमबाह्य उत्खननाला आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# इलेक्ट्रॉनिक सिगारेटच्या अनधिकृत साठ्यावर धाड ! 2 लाख 75 हजारांच्या मुद्देमालासह आरोपीस अटक

प्रतिनिधी २७ जून

**अमरावती :** विक्रीच्या उद्देशाने इलेक्ट्रॉनिक सिगारेटचा मोठ्या प्रमाणात अनधिकृत साठा असलेल्या ठिकाणी अमरावती शहर गुन्हे शाखेने धाड टाकली. या कारवाई विक्री करणाऱ्या इसमास मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले आहे.

२६ जून रोजी गुन्हे शाखेच्या पथकास गोपनिय बातमीदारामार्फत माहिती मिळाली कि, केडीया नगर येथील गजानन टॉवर अपार्टमेंटमधील ५०१ फ्लॅटमध्ये आशिष कडू याने सरकारने प्रतिबंधित केलेल्या इलेक्ट्रॉनिक सिगारेटची विक्री करण्याच्या उद्देशाने अनाधिकृत साठा साठवुन ठेवला आहे. या माहितीवरून गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर सोबत गुन्हे शाखेचे पथक नमुद ठिकाणी गेले असता ५०१ फ्लॅट मध्ये आशिष बाबुराव



कडू (४०) रा. केडीया नगर अमरावती यास सोबत घेवुन सदर फ्लॅटची झडती घेतली असता स्टोअर रूममध्ये एका पुस्ट्राच्या बॉक्सची पाहणी केली असता त्यामध्ये वेगवेगळया फ्लेवरच्या ५५ इलेक्ट्रॉनिक सिगारेट दिसुन आल्या. याची किंमत अंदाजे २ लाख ७५ हजार एवढी आहे. त्या जप्त करून आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन राजापेठ येथे कलम २७५ बि.एन.एस. सहकलम ३,४,५,७ प्रोव्हिबिशन ऑफ ईलेक्ट्रॉनिक सिगारेट ॲक्ट प्रतिबंध अधिनियम २०१९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ मुख्यालय, सपोआ शिवाजी बचाटे (गुन्हे शाखा) यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पो. नि. अतुल वर, पो.नि. दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वात सपोनि. महेश इंगोले, मनिष वाकोडे, दशरथ आडे, पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार सुनिल लासुरकर, दिपक सुंदरकर, गजानन ढेवले, आस्तिक देशमुख, मनोज ठोसर, मंगेश परिमल, सचिन बहाळे, जहीर शेख, मिर्झा नईम बेग, अतुल संभे, विकास गुडधे, विशाल वाकपांजर, योगेश पवार, राजीक रायलीवाले, चेतन गुल्हाणे, चालक संदीप खंडारे, राहुल दुधे यांनी केली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK